संस्थेचे नाव :- श्री महालक्ष्मी ग्रामिणि बिगर शेती सहकारी पत संस्था मर्यादित, रूकडी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर

नोंदणी क्रमांक :- रजि.नं.केपीआर/एचएलई/आरएसआर/(सीआर)/१९६७/२०००

दिनांक :- दि. १४/०८/२०००

6.3.1

## ज्ञापन :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १३(२) व १३(३) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मी सुनिल सिंगतकर , उपनिबंधक , सहकारी संस्था हातकणंगले , ता.हतकणंगले जि.कोल्हापूर * **श्री महालक्ष्मी ग्रामिणि बिगर शेती सहकारी पत संस्था मर्यादित, रूकडी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर** * या संस्थेच्या दिनांक १२/०४/२०१३ रोजी झालेल्या विशेष साधारण सभेमध्ये मंजूर झालेल्या उपविधी बाबत खालील प्रमाणे आदेश देत आहे.

| उपविधी क्रमांक | आदेश | दुरूस्ती उपविधीची शब्द रचना |
|---|---|---|
| अ १ ते ७२ | मंजूर | **सोबत जोडले पुरवणी क्र.४ प्रमाणे आदर्श उपविधी २०१३ मंजूर.** (शासन निर्णय अधिसुचना दिनांक १४ फेब्रुवारी २०१३ चे अधिसुचने नुसार आदर्श उपविधी लागू करून घेणे बंधनकारक असलेने व मा.सहाकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडील सुचना नुसार मंजूर करणेत येत आहे.) |

संस्थेच्या दप्तरी सदर ज्ञापन जोडून ठेवावे.सदरची उपविधी दुरूस्ती सदर ज्ञापनाचे दिनांका पासून अंमलात येईल. सदरचे ज्ञापन मी माझे स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रेनिशी आज दिनांक १४/५/२०१३ रोजी निर्गमीत केले आहे.

संस्थेच्या दप्तरी असलेल्या पोटीयम प्रतीस सदर ज्ञापन जोडून ठेवावे.

(सुनिल सिंगतकर)
**उप निबंधक**
सहकारी संस्था हातकणंगले

उपनिबंधक सहकारी संस्था ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

जा.क्र.कक्ष.२ / नापत/पोनिदु/२०१३
उपनिबंधक,सहकारी संस्था हातकणंगले
यांचे कार्यालय
दिनांक १४/५/२०१३

प्रति,

१) सचिव/ चेअरमन , **श्री महालक्ष्मी ग्रामिणि बिगर शेती सहकारी पत संस्था मर्यादित, रूकडी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर**

२) मा.जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था कोल्हापूर

३) मा.जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था कोल्हापूर

Baylaws 97 act.bja.

# पुरवणी क्रमांक ४

संस्थेचे नांव :- श्री महालक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सह. पत संस्था मर्या; रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

ता.हातकणंगले जि.कोल्हापूर

दिनांक १०/ ४ /२०१३ रोजी झालेल्या विशेष/वार्षिक सर्वसाधारण सभेत संमत झालेल्या उवविधी २०१३ दुरुस्ती बाबत ची शब्दयोजना

| उपविधीचा क्रमांक | दुरुस्त उपविधीची शब्दयोजना |
|---|---|
| आदर्श उपविधी २०१३ क्रमांक | केंद्र शासनाने ९७ वी घटना दुरुस्ती करून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश दिनांक १४ फेब्रुवारी २०१३ रोजीने आणखी दुरुस्त्या केल्या असून संस्थेची मुळ उपविधी बदलून आदर्श उपविधी २०१३ क्रमांक १ ते. प्रमाणे आहे. |

सचिव समिती सदस्य सभापती

श्री महालक्ष्मी ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था

मर्या; रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi



# नागरी/ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था

## आदर्श उपविधी

अ) प्रस्तावना

१) पतसंस्थेचे नाव आणि पत्ता

संस्थेचे नाव ...श्री महालक्ष्मी... नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित ...रुकडी... असे राहील. आणि सदर संस्थेची नोंदणी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० नोंदणी क्र. ९४६० दि. ९/८/१९/२०००. अन्वये झाली. यापुढे उपविधीमध्ये सदर नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित या संस्थेचा उल्लेख 'संस्था' म्हणून करण्यात येईल.

२) नोंदणीकृत कार्यालय :

१) संस्थेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय ...मु.पो. रुकडी हातकणंगले... या पत्त्यावर असेल.

२) वरील पत्त्यामध्ये कोणताही बदल करावयाचा झाल्यास सदर उपविधी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये दिलेल्या पद्धतीनुसार दुरूस्ती करावी लागेल व त्यांस सहकार खात्याची पूर्व परवानगी घ्यावी लागेल. उपविधीत दुरूस्ती करून ती नोंदली गेल्याशिवाय तो बदल नोंदला आहे असे समजता येणार नाही.

३) संस्थेचे कार्यक्षेत्र –

संस्थेचे कार्यक्षेत्र ...रुकडी गावापुरते... यांच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादीत राहील. यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास नोंदणी अधिकारी याची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

३ अ) संस्थेचा वर्ग / वर्गीकरण – संस्थेचा वर्ग साधन संस्था (रिसोर्स सोसायटी) आणि उपवर्ग कर्ज देणाऱ्या साधन संपत्ती (क्रेडिट रिसोर्स सोसायटी) असा राहील.

४) व्याख्या –

१) 'कायदा' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरूस्त्या होय.

२) 'नियम' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरूस्त्या होय.

३) 'निबंधक' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार नेमण्यात आलेला सहकारी संस्थांचा 'निबंधक' ही व्यक्ती होय.

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

४) **'उपविधी'** म्हणजे संस्थेचे सध्या अस्तित्वात असलेले व कायद्यानुसार नोंदणी करण्यात आलेले उपविधी आणि त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरूस्त्या होय.

५) **'बोर्ड'** म्हणजे संस्थेचे संचालक मंडळ होय.

६) **'सर्व साधारण सभा'** म्हणजे उपविधीतील तरतूदी नुसार सर्व सभासदांची वार्षिक साधारण सभा. यामध्ये विशेष सर्वसाधारण सभेचाही समावेश होईल.

७) **'मुख्य कार्यकारी अधिकारी'** म्हणजे संस्थेतील सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी होय. सदर अधिकाऱ्यास सचिव /व्यवस्थापक/ सरव्यवस्थापक / महाव्यवस्थापक/ कार्यकारी संचालक नावाने संबोधले तरी त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी असेच समजण्यात यावे. असा अधिकारी हा संस्थेच्या संचालक मंडळाचा पदसिद्ध सदस्य (कार्यरत संचालक) असेल.

८) **'व्यक्ती'** म्हणजे कोणतीही प्रौढ व्यक्ती जी इंडियन कॉंट्रॅक्ट ॲक्ट १८७२ च्या कलम ११ नुसार करार करू शकते. स्वत:च्या मालकीची मालकी संस्था असलेली व्यक्ती, भारतीय भागीदारी कायदा १९३२ अन्वये नोंदलेली भागीदारी संस्था, अविभक्त हिंदू कुटुंब, राज्य सरकार, सार्वजनिक विश्वस्थ संस्था किंवा इतर कोणत्याही प्रचलित कायद्यानुसार नोंदणी करण्यात आलेली कोणतीही कंपनी अथवा संस्था होय.

९) **'पदाधिकारी'** म्हणजे संचालक मंडळाने निवडलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष, मानद सचिव, खजिनदार, कार्यरत संचालक, सचिव नेमणूक करण्यात आलेले मुख्य कार्यकारी अधिकारी, अवसायक, प्रशासक व अन्य अशी कोणतीही व्यक्ती जीची नियुक्ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांतर्गत व संस्थेच्या आदर्श उपविधीनुसार संस्थेचा व्यवसाय चालविण्यासाठी आदेश / मंजुरी देणारी व्यक्ती.

११) **'सर्वसाधारण सभासद'** म्हणजे संस्थेच्या नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणीनंतर कायदा, नियम व उपविधीनुसार ज्याचे सभासदत्व स्वीकारण्यात आलेले आहे अशी व्यक्ती.

१२) **'नाममात्र सभासद'** म्हणजे सदर उपविधीतील उपविधीमधील तरतूदीनुसार ज्या व्यक्तीचे सभासदत्व स्वीकारले आहे अशी व्यक्ती.

१३) **क्रियाशील सभासद म्हणजे जो/जी सभासद व्यक्ती जी मागील सलग पाच वर्षांपैकी किमान एका सर्वसाधारण सभेस उपस्थित असेल आणि तिचा संस्थेने उपविधीमध्ये ठरविलेल्या निकषानुसार संस्थेच्या व्यवसायामध्ये थेट सहभाग असेल अशी व्यक्ती.**

१४) **'सहयोगी सभासद'** म्हणजे संस्थेचे दुसऱ्या सभासदाबरोबर भाग धारण केलेली व्यक्ती अशा व्यक्तीचे नाव भाग प्रमाणपत्रावर पहिले असणार नाही.

१५) **'सहकारी संस्था'** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आलेली संस्था.

१६) **'फेडरल सहकारी संस्था'** म्हणजे सहकारी संस्था अधिनियमांतर्गत नोंदण्यात आलेली नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची तालुका / जिल्हा/ विभाग/ राज्य पातळीवरील संघीय संस्था होय. त्या संघीय संस्थेचे सभासद संघीय संस्थेच्या कार्यक्षेत्रानुसार असतील.

१७) **'सहकारी पतसंस्था'** म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेली अथवा नोंदणी करावयाची सहकारी संस्था.

१८) **'थकबाकीदार'** म्हणजे सतत नव्वद दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरीता थकित असणारी कर्जदार व्यक्ती तसेच सदर कर्जास जामिन असणारी व्यक्ती.

१९) **'सहकार वर्ष'** म्हणजे दि. ०१ एप्रिल ते दि. ३१ मार्च मधील कालावधी.

२०) **'कार्यक्षेत्र'** म्हणजे संस्थेच्या नोंदणी वेळी किंवा त्यानंतर सहकार खात्याने मान्यता दिलेले भौगोलिक कार्यक्षेत्र.

Rajarshi Shahu Arts & Comm. College, Rukadi



२१) **'सहकारी तत्वे'** म्हणजे आंतरराष्ट्रीय / देशपातळीवर वेळोवेळी जाहीर केलेली सहकाराची तत्वे होय.

२२) **'राज्य सरकार'** म्हणजे महाराष्ट्र राज्याचे सरकार होय.

२३) **'सेवक'** म्हणजे संस्थेच्या सेवेमध्ये कार्यरत असलेली व संस्थेशी करारान्वये नोकरीत असलेली व्यक्ती.

२४) **'नोटिफिकेशन'** म्हणजे केंद्र व राज्य सरकारच्या अधिकृत गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले नोटीफिकेशन.

२५) **'तज्ञ संचालक'** म्हणजे अशी व्यक्ती ज्या व्यक्तीला बँकिंग / कायदा / लेखांकन / सहकार क्षेत्रातील व्यवस्थापकीय पातळीवरील किंवा संचालक मंडळ सदस्य म्हणून किमान ५ वर्षांचा अनुभव असेल. अथवा सनदी लेखापाल म्हणून सदर व्यक्ती कामकाज करीत असेल.

२६) **'कार्यलक्षी संचालक'** म्हणजे संस्थेने उपविधीतील तरतूदीनुसार नियुक्त केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी/ महाव्यवस्थापक /व्यवस्थापक/ सचिव/ कार्यकारी संचालक/व्यवस्थापन पातळीवरील अधिकारी व्यक्ती.

२७) **स्वनिधी म्हणजे** (वसुल भाग भांडवल + रिझर्व्ह फंड + इमारत निधी + लाभांश समीकरण निधी + निव्वळ नफ्यातून निर्माण झालेला गुंतवणूक चढउतार निधी + उत्तम जिंदगीवरील तरतुद + निव्वळ नफ्यातून काढलेला परंतु कोणतीही बाद्य देयता नसलेला निधी) – (संचित तोटा) – (वैधानिक लेखा परिक्षकांनी सुचविलेली व संस्थेने थकीत व्याज अनुत्पादक कर्ज व कराव्या लागणाऱ्या परंतु कमी केलेल्या खर्चाची तरतुद) अशी प्रतिवर्षी वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली रक्कम.

२८) **'संस्था'** म्हणजे .......................... संस्था लि.

## ब) उद्देश -

५) **उद्देश**

संस्थेचा मुख्य उद्देश ठेवीदारांचे हित जपणे हा असून सभासदांमध्ये सामाजिक व आर्थिक प्रगती साधणे व सदर प्रगती सहकाराच्या तत्वानुसार स्वत:साठी व एकमेकांसाठी एकमेकांच्या मदतीद्वारे साधणे होय.

१) सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार्याची भावना वृद्धिंगत करणे.

२) सभासदांकडून ठेवी स्वीकारणे, त्याचा विनियोग कर्ज देणे अथवा गुंतवणूक करणे, यासाठी करणे.

३) कर्जाची उभारणी करणे.

४) सर्व प्रकारचे बॉण्डस्, कर्ज रोखे, बचत चिठ्या व इतर प्रकारच्या मौल्यवान वस्तू ठेवीच्या स्वरूपात अथवा सुरक्षित तिजोरीत ठेवण्यासाठी स्वीकारणे.

५) सुरक्षित तिजोरी घर (सेफ डिपॉझीट व्हॉल्ट) व तद्नुषंगिक सेवा उपलब्ध करून देणे.

६) सुरक्षा पत्रे व रोख रकमांची देवाण- घेवाण करणे, पाठविणे.

७) बचत गट स्थापन करणे, त्यांना अर्थसहाय्य करणे, उद्योग व्यवसायासाठी मार्गदर्शन करणे तसेच शासकीय, निमशासकीय किंवा अन्य कोणत्याही वित्त संस्थेकडून निधी उपलब्ध करणे.

८) संस्थेच्या कामकाजाच्या उपयुक्ततेच्या दृष्टिने सहकार खात्याचे प्रचलित नियमास अनुसरून संस्थेस आवश्यक तेवढीच वास्तू /जागा संपादन करणे, इमारत बांधणे, तिची देखभाल करणे अथवा रूपांतर करणे.

९) **संस्थेच्या पूर्ण अथवा अंशत: येण्यापोटी ताब्यात असलेल्या मालमत्तेची व्यवस्था करणे, विकणे अथवा अन्य** तऱ्हेने विल्हेवाट लावणे.

१०) सहकार खात्याच्या पूर्व परवानगीने संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये जनतेला सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बँकांचे बिझनेस करसपॉन्डन्स् अँन्ड बिझनेस फॅसिलिटेटर, शाखा, ए.टी.एम., नवीन स्थानी शाखा/ मुख्य कार्यालय स्थलांतरित करणे.

R. No. KPR/HLE/ RSR/CR/1967 /970 Dt. 1.2.8.2000



Rajarshi Shahu Arts & Comm. College, Rukadi

११) सहकार खाते यांच्या पूर्व परवानगीने इतर कोणत्याही सहकारी संस्थेचा कारभार पूर्णपणे अथवा अंशतः ताब्यात घेणे अथवा व्यवस्थापन करण्यासाठी घेणे.

१२) सभासदांच्या संस्थेच्या आजी व माजी कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने पूरक अशा संघटना, संस्था, निधी, विश्वस्त निधी स्थापन करणे, स्थापन करण्यास मदत करणे अथवा त्यामध्ये सहभागी होणे. तसेच संस्थेचे आजी व माजी कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचा विमा उतरविणे धर्मादाय व परोपकार करण्याच्या उद्देशाने कार्यरत असणाऱ्या सार्वजनिक संस्थांना वर्गणी देणे अथवा त्यांचे व्यवस्थापन पाहणे, ट्रस्टी म्हणून काम करणे.

१३) सभासदांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी विविध योजना करून कर्जपुरवठा करणे.

१४) लघु व कुटीर उद्योग धंद्यांना अर्थ पुरवठा व तंत्रज्ञान उपलब्ध करणे. स्वयंरोजगारी उद्योजकांना स्वतःचा उद्योग धंदा उभा करण्यास मदत करणे.

१५) जेथे आवश्यक असेल तेथे सहकार खात्याच्या परवानगीने इतर सहकारी पतसंस्था / सहकारी बँका यांच्या सहभाग कर्ज योजनेत भाग घेवून गरजूंना कर्ज पुरवठा करणे.

१६) विविध शासकीय संस्था, निमशासकीय संस्था व कायद्याच्या तरतूदीने अस्तित्वात येणाऱ्या संस्था इत्यादीसाठी अधिकृत प्रतिनिधी संस्था म्हणून निधी जमा करण्याचे काम करणे.

१७) राज्य सरकारने सुचविल्यानुसार इतर कोणत्याही स्वरूपाचा व्यवसाय जो सहकारी संस्था कायदेशीरपणे करू शकतात असा व्यवसाय करणे.

१८) संस्थेचे सभासद, ठेवीदार, ग्राहक, सार्वजनिक संस्था, इतर संस्था व संलग्न संस्था यांना आर्थिक, तांत्रिक कायदेशीर संगणक आधारित व तद्नुषंगिक सेवा पुरविणे.

१९) विमा कंपन्यांबरोबर करार करून कोणतीही आर्थिक गुंतवणूक न करता कॉर्पोरेट / रेफरल पद्धतीनुसार विमा व्यवसाय अंगिकारणे.

२०) मा. निबंधक यांच्या परवानगीने समान उद्दिष्टे असलेल्या सहकारी संस्था विलिनीकरण करून घेणे, व्यवस्थापन पाहणे, ताब्यात घेणे.

२१) उपरोक्त सर्व किंवा एखादा उद्देश साधण्यासाठी लागणाऱ्या अनुषंगिक सर्व गोष्टी करणे.

## क) निधी

६. निधी

खालील साधनांनी निधी उभारता येतील.

१. भाग भांडवल

२. निधी

३. वर्गणी

४. ठेवी

५. कर्जे

६. देणग्या, अनुदान व आर्थिक सहाय्य

७. पुनर्वित्त

८. मा. निबंधक यांचे परवानगीने वेळोवेळी उपलब्ध होणारी इतर साधने

Shahu Arts & Comm. College, Rukadi



७. **भाग भांडवल**

संस्थेच्या दर्शनी भागाची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) इतकी राहील.

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ............... (अक्षरी रुपये ............................) इतके असून ते रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) दर्शनी किंमतीच्या ............. इतक्या भागात विभागलेले असेल.

८. **ठेवी व कर्ज उभारण्याची मर्यादा –**

कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये संस्थेत बाहेरील कर्ज व ठेवीच्या रूपाने उभारल्या जाणाऱ्या निधीची मर्यादा प्रचलित महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियमातील तरतूदीस अनुसरून राहील.

८ अ. **बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा –**

पतसंस्थेला अन्य कोणत्याही मान्यता प्राप्त वित्तीय संस्थेकडून कर्ज उभारण्याची मर्यादा खालील प्रमाणे राहील.

अ) पतसंस्थेला अन्य मान्यता प्राप्त वित्तीय संस्थेकडून त्यांचेकडे असलेल्या निर्धारित रोख तरलता व वैधानिक तरलते व्यतिरिक्त असणाऱ्या अतिरिक्त गुंतवणुकीच्या तारणावर कर्ज मर्यादा खालील प्रमाणे राहील.

१) मागील सलग तीन वर्षे वैधानिक लेखा परिक्षण 'अ' किंवा 'ब' वर्ग असल्यास स्वनिधीच्या चारपट मर्यादा राहील.

२) इतर संस्थासाठी स्वनिधीच्या दुप्पट एवढी बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा राहील.

सदर उभारणी केलेल्या रकमेचा विनियोग रोख तरलता / वैधानिक तरलता/ कर्ज वाटप किंवा ठेव परत करणे या कारणांसाठीच केला जाईल.

## ड) सभासदत्व

९. **सभासदत्व**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २२ मधील तरतुदीस अधिन राहून कोणत्याही सभासद होण्यास पात्र व्यक्तीस सभासद करून घेतले जाईल.

१०. **सर्वसाधारण सभासद :**

१. पतसंस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहणारी अथवा व्यवसाय करणारी व ज्या व्यक्तीला संस्थेच्या सेवांची गरज आहे व ती गरज संस्था पुरवू शकत असेल व त्या व्यक्तीचा व्यवसाय संस्थेच्या व्यवसायाशी समांतर अथवा स्पर्धा निर्माण करणारा नसेल तर अशा व्यक्तीस सर्वसाधारण सभासद म्हणून स्वीकारले जाईल.

२. संस्थेचे सर्वसाधारण सभासद म्हणून खालील दिलेल्या यादी व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस सभासद म्हणून स्वीकारले जाणार नाही.

   अ) सज्ञान असलेली व इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १८७२ च्या कायद्यानुसार करार करण्यास पात्र असलेली व्यक्ती.

   ब) स्वतःच्या मालकीच्या संस्था असलेल्या व्यक्ती.
   (प्रोप्रायटरी शिप)

R. No. ... /1967 ... ता. हातकणंगले

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

क) भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार नोंदणी झालेली भागीदारी संस्था

ड) कंपनी कायद्यानुसार नोंदविलेली कंपनी अथवा अन्य प्रचलित कायद्यानुसार नोंदविलेली संस्था

इ) म.स.सं. अधिनियमान्वये नोंद केलेली अथवा नोंदवण्यात आल्याचे समजण्यात येणारी संस्था.

ई) विश्वस्त संस्थांसाठी प्रचलित असलेल्या कायद्यानुसार नोंदविलेली विश्वस्त संस्था.

११. **सर्वसाधारण सभासदत्वासाठी अटी :**

१. खालील अटी पूर्ण करणाऱ्या अर्जदारास सर्वसाधारण सभासद म्हणून स्वीकारण्याबाबत विचार करण्यात येईल. जर त्याने-

अ) विहीत नमुन्यामध्ये लिखित स्वरूपात अर्ज केला असला पाहिजे व अशा अर्जाला संचालक मंडळाची मंजुरी दिली असली पाहिजे.

ब) प्रवेश शुल्कापोटी रु. १०/- व किमान एका भागाची रक्कम भरणा केली असली पाहिजे.

क) ती संस्थेच्या कार्यक्षेत्रातील / रहिवासी / व्यावसायिक असली पाहिजे.

ड) कायदा, नियम व संस्थेचे उपविधी यानुसार सर्व अटींची पूर्तता केली असेल.

इ) सदर व्यक्तीने सहकार खात्याने वेळोवेळी दिलेल्या के.वाय.सी. (Know Your Customer) निकषांची पूर्तता केली असली पाहिजे.

फ) म.स.सं. अधिनियम १९६० नियम ४५ नुसार पुर्तता केली असली पाहिजे.

२. संचालक मंडळ सभेमध्ये त्याचा अर्ज मंजूर होवून त्यास सभासद म्हणून स्वीकारण्यास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

३. जर व्यक्तीने खालील पैकी कोणत्याही एखाद्या अटींची पूर्तता केली नसेल तर ती व्यक्ती सभासद म्हणून स्वीकारण्यास अपात्र होईल.

अ) वयाची १८ वर्षे पूर्ण केली नसतील अशी व्यक्ती.

ब) अधिकृत न्यायालयाने दिवाळखोर अथवा दोषमुक्त न केलेल्या दिवाळखोर ठरविले असेल अशी व्यक्ती.

क) कोणत्याही फौजदारी गुन्ह्यासाठी शिक्षा झाली असेल अशी व्यक्ती.

ड) संस्था करीत असलेला व्यवसाय करीत असणारी व्यक्ती अथवा कंपनी / फर्म

इ) म.स.सं अधिनियम १९६० कलम ३५ नुसार सभासदास काढून टाकले असल्यास त्यातील तरतुदी नुसार विहित कालावधी पूर्ण होईपर्यंत.

ई) म.स.सं अधिनियम १९६० कलम ३५ व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणाने सभासदत्व संपुष्टात आले असल्यास सभासदत्व संपुष्टात आलेल्या तारखेपासून किमान एक वर्ष सभासद होता येणार नाही.

१२. **सर्वसाधारण सभासदांचे हक्क**

प्रत्येक सर्वसाधारण सभासदांना (क्रियाशील सभासदाव्यतिरिक्त) पुढील हक्क प्राप्त होतील .

प्रत्येक सर्वसाधारण सभासदास संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत मतदान / सहभाग वगळता सभासदत्वाचे इतर सर्व हक्क प्राप्त होतील.

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi



१३. **सभासदत्वाचा अर्ज व त्याबाबतची कार्यवाही.**

अ) सर्वसाधारण सभासदत्वासाठी अर्जदाराने संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात रु. १०/- इतक्या प्रवेश फी सहीत अर्ज सादर केला पाहिजे. अर्जदाराने त्याबरोबरच संस्थेच्या किमान एक भागाची रक्कम अर्ज सादर करताना भरली पाहिजे.

ब) जे अर्ज सर्व दृष्टीने पूर्णपणे भरलेले आहेत, व के. वाय. सी. (Know Your Customer) निकषांची पूर्तता केले आहेत तसेच योग्य त्या रकमेचा भरणा केलेला आहे, अशा अर्जावर संस्थेतर्फे अर्ज मिळालेपासून ३ महिन्याच्या आत संचालक मंडळ सभेमध्ये निर्णय घेतला जाईल व असा निर्णय घेतल्यापासून ३ महिन्याच्या आत तो अर्जदारास कळविला जाईल.

सभासदत्व प्राप्त झालेल्या सभासदाने जादा भाग भांडवल घेतल्यास अशा अर्जांनाही संचालक मंडळ सभेची मान्यता अनिवार्य असेल.

१४. **क्रियाशील सभासद**

**क्रियाशील सभासद म्हणजे जो/जी सभासद व्यक्ती जी मागील सलग पाच वर्षांपैकी किमान एका सर्वसाधारण सभेस उपस्थित असेल आणि तिचा संस्थेने उपविधीमध्ये ठरविलेल्या निकषानुसार संस्थेच्या व्यवसायामध्ये थेट सहभाग असेल अशी व्यक्ती. अशा सभासदास संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीमध्ये मतदान करता येईल.**

१५. **संस्थेच्या व्यवसायात थेट सहभाग असण्यासाठी किमान पात्रता**

१) त्याने मागील सलग पाच सर्वसाधारण सभांपैकी किमान एका सभेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

२) त्याने संस्थेचा किमान एक भाग धारण केलेला असावा.

३) अ) क्रियाशील सभासदाचा व्यावसायिक थेट सहभाग म्हणजे मागील सलग पाच वर्षांपैकी किमान एक वर्षासाठी रुपये पाच हजार किंवा त्यापेक्षा जास्त रकमेचे कर्ज घेतलेले असले पाहिजे. सदर कर्जव्यवहार संपूर्ण कालावधीमध्ये केव्हाही अनुत्पादक कर्जामध्ये समाविष्ट झालेले नसले पाहिजे.

**किंवा**

ब) क्रियाशील सभासदाचा व्यावसायिक थेट सहभाग म्हणजे मागील सलग पाच वर्षांपैकी किमान एक वर्षासाठी ठेवी संदर्भात किमान व्यवहार खालील प्रमाणे संस्थेच्या खेळत्या भांडवलाच्या प्रमाणात असला पाहिजे.

| क्र. | पतसंस्थेचे खेळते भांडवल | किमान ठेव |
|---|---|---|
| १) | रूपये २५ लाखापेक्षा कमी | रू. १००० |
| २) | रूपये २५ लाखापेक्षा जास्त आणि रू. १ कोटीपेक्षा कमी | रू. २५०० |
| ३) | रू. १ कोटी व त्यापेक्षा जास्त आणि रू. २५ कोटीपेक्षा कमी | रू. ५००० |
| ४) | रू. २५ कोटी व त्यापेक्षा जास्त | रू. १०००० |

किंवा

क) ठेवी व कर्जे या व्यतिरिक्त पतसंस्था पुरवित असलेल्या अन्य पूरक सेवा त्याने मागील सलग ५ वर्षांपैकी किमान १ वर्षासाठी रुपये १००० किंवा त्यापेक्षा जास्त रकमेची संस्थेकडून घेतली असली पाहिजे.

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

क्रियाशील सभासद होण्यासाठी वरील पैकी पात्रता क्र.१ व २ या बंधनकारक असून पात्रता क्र. ३ मधील अ, ब किंवा क यापैकी कोणत्याही एका पात्रतेची पूर्तता करणे आवश्यक राहील.

सध्या अस्तित्वात असलेले जे सभासद क्रियाशील सभासदत्वाची किमान पात्रता पूर्ण करीत नसतील त्यांना सदर पात्रता पूर्तता करण्यासाठी सदर उपविधी मंजूर झाल्यापासून एक वर्षाचा कालावधी दिला जाईल. सदर निकषांची प्रसिद्धी करण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.

टीप – सदर पात्रता ही प्रत्येक संस्थेसाठी किमान पात्रता असेल. या व्यतिरिक्त संस्थेला त्यांचे व्यवसाय व्याप्ती नुसार पात्रता बदलावयाची असल्यास पात्रता क्र. १ ही बंधनकारक राहील व केवळ पात्रता क्र. २ व ३ (अ, ब किंवा क) ह्यामध्येच वार्षिक साधारण सभा मान्यतेने बदल करता येईल.

१६. **क्रियाशील सभासदांचे हक्क –**

१) संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीमध्ये मतदान करण्याचा हक्क, तथापि कोणत्याही व्यक्तिगत सभासदास प्रतिनिधीद्वारे मतदान करता येणार नाही.

२) सर्वसाधारण सभासदांचे सदर उपविधीमध्ये उल्लेख केलेले सर्व हक्क क्रियाशील सभासदास बजावता येतील.

१७. **सहयोगी सभासदत्व– अधिकार व जबाबदाऱ्या**

१) संस्थेचे भाग एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावे घेता येतील.

२) सहयोगी भागधारकांचे बाबतीत कोणाही एकाच्या मृत्यूनंतर हयात असलेल्या व्यक्ती सहयोगी / सर्वसाधारण भागधारक म्हणून गणल्या जातील.

३) सहयोगी भागधारक संबंधित भागाबाबतच्या देण्यास संयुक्तपणे / विभक्तरित्या जबाबदार राहतील.

४) **सहयोगी भागधारकाचे बाबतीत भाग दाखल्यावर ज्याचे प्रथम नाव लिहिले असेल त्यालाच क्रियाशील सभासदांचे सर्व निकष पूर्ततेनंतर संबंधित सर्व हक्क प्राप्त होतील अथवा त्याचे सर्वसाधारण सभासदाचे हक्क अबाधित राहतील.**

५) ज्यावेळेस संस्थेचा भाग एकापेक्षा जास्त व्यक्तींनी धारण केलेला असेल त्यावेळेस ज्या व्यक्तीचे नाव प्रथम असेल त्या व्यक्तीस, मतदानाचे अधिकार प्राप्त होतील. पण त्या व्यक्तीच्या गैरहजेरीत ज्या व्यक्तीचे नाव नंतर असेल त्या व्यक्तीस मतदानाचे अधिकार असतील हाच नियम प्रत्येक पुढील नाव असलेल्या व्यक्तीस लागू होईल. मात्र अशी व्यक्ती अज्ञान असता कामा नये.

१८. **नाममात्र सभासद :**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीस अधिन राहून कोणत्याही व्यक्तीस त्यास विहित नमुन्यात अर्ज व विनापरतीची प्रवेश फी रु. १०/– भरल्यानंतर, जो संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत अथवा वास्तवास आहे, अशा व्यक्तीस नाममात्र सभासद करून घेता येईल व त्यास संचालक मंडळ सभेत मान्यता घ्यावी लागेल. खालील नमूद केलेले अधिकार नाममात्र सभासदांना प्राप्त होणार नाहीत.

अ) भागभांडवल घेणे.

ब) शेअर सर्टिफिकेट मिळणे.

क) लेखापरिक्षण झालेली आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल मिळणे.

अ) वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभांना हजर राहणे, भाग घेणे, मतदान करणे.

इ) लाभांश मिळणे.

ई) संचालक मंडळाच्या निवडणूकीस उभे राहणे व मतदान करणे.

उ) क्रियाशील सभासदत्व मिळणे/ सर्वसाधारण सभासदत्व मिळणे.

मात्र महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अ नुसार महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक सी.सी. आर.- ११०८/प्र.क्र. ६४७/७- सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय मुंबई यांचे दिनांक १७ / १०/२००८ चे निर्देशानुसार नागरी/ग्रामीण बिगर शेती पतसंस्थांचे ठेवी व कर्जाबाबतचे व्यवहार हे फक्त सर्वसाधारण सभासदांशीच करता येतील.

१९. **सभासदांची जबाबदारी :**

सभासदांनी घेतलेल्या भागांच्या रकमेइतकीच त्याची जबाबदारी राहील. माजी सभासदांची जबाबदारी ज्यावेळी त्यांचे सभासदत्व रद्द झाले, त्यावेळेपासून दोन वर्षापर्यंत राहील. तसेच मयत सभासदाचे मालमत्तेवर त्याच्या जबाबदारीपोटी मयत दिनांकापासून दोन वर्षेपर्यंत बोजा राहील.

२०. **सभासदांची ओळख (के.वाय.सी. नॉर्मस् लागू करणेबाबत)**

संस्थेबरोबर होणाऱ्या सर्व व्यवहारांचे बाबतीत सभासदांची ओळख असणे आवश्यक आहे. सदर ओळखीसाठी सर्व सभासदांनी सहकार खात्याने लागू केलेल्या आपला ग्राहक जाणा (के.वाय.सी.) या मार्गदर्शक तत्वांची पूर्तता करणे आवश्यक आहे. सध्या असलेल्या सभासदांनी सुद्धा सदर बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सभासदांची ओळख संस्थेमधील अधिकारी किंवा अधिकृत अधिकारी करतील. ओळखपत्र म्हणजे शासनाने वेळोवेळी अधिकृत जाहीर केलेले ओळखपत्र किंवा संस्थेने सभासदास मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षांकित करून दिलेले ओळखपत्र ग्राह्य धरणेत येईल.

२१. **संचालक मंडळ निवडणूकीसाठी मतदानाचा हक्क :**

१) फक्त क्रियाशील सभासदांना त्यांचे भागांची संख्या कितीही असली तरी एक मत देण्याचा हक्क राहील.

२) व्यक्तिगत सभासदांनी स्वतः उपस्थित राहून मतदान करणे आवश्यक आहे. संस्था / कंपनी / विश्वस्त संस्था/ अन्य कोणत्याही कायद्याद्वारे स्थापित झालेल्या संस्था यापैकी जे सभासद असतील त्यांना मतदानासाठी भागीदार, संचालक अथवा पदाधिकारी यांची प्रतिनिधी म्हणून नेमणूक करता येईल.

३) जे क्रियाशील सभासद थकबाकीदार असतील तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम २७ ची पूर्तता करीत नसल्यास असे सभासद मतदान करण्यास अपात्र राहतील.

४) क्रियाशील सभासदांनी मतदानाचा हक्क बजावण्यापूर्वी संस्थेमध्ये क्रियाशील सभासद होण्याकरीता आवश्यक असलेली पूर्तता संस्थेच्या उपविधीप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२२. **सभासदत्वाचा राजीनामा देणे :**

१) सभासद आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देवून स्वतःचे भाग भांडवल संचालक मंडळाचे संमतीने परत घेवू शकेल. परंतु तसे करण्यापूर्वी त्याचेकडे कर्ज व जामिनकीपोटी येणे असलेल्या सर्व रकमांची परतफेड झाली असली पाहिजे. तसेच सभासदत्वाचा राजीनामा देताना किमान एक वर्षाचा कालावधी झालेला असावा व त्यासाठीची सूचना किमान एक महिना अगोदर देणे आवश्यक आहे. कोणत्याही सहकारी वर्षात अशा तऱ्हेने परत करण्यात आलेले भांडवल त्यापूर्वीच्या दि. ३१ मार्च रोजी असलेल्या वसूल भाग भांडवलाचे १०% पेक्षा जास्त असणार नाही. अशा परत करण्यात येणाऱ्या भाग भांडवलाची किंमत त्या अगोदरच्या वर्षाच्या मुल्यांकनानुसार राहील.



Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

श्री महालक्ष्मी स. शि. शेती सह. पत संस्था ... R. No. KPR/RLB/RSR/...1967/2000 Dt. 14-8-2000

Rajarshi ... Arts & Comm. College, Rukadi

२) ज्या सभासदांनी राजीनामा देवून भाग भांडवल काढून घेतले आहे, अशा सभासदांना राजीनामा दिल्यापासून किमान एक वर्षापर्यंत परत संस्थेचे सभासदत्व मिळण्यास परवानगी दिली जाणार नाही.

२३ अ. **सभासदत्व संपुष्टात येणे :**

पुढील बाबतीत सभासदत्व संपुष्टात येईल.

अ) व्यक्तिगत सभासदाचा मृत्यू झाल्यास किंवा भागीदारी संस्था, कंपनी व इतरांच्या बाबतीत विसर्जन अथवा दिवाळखोरी झाल्यास.

ब) नादारी जाहीर झाल्याने अथवा कायदेशीर तरतुदीने सभासद राहण्यास लायक न ठरल्यास.

क) संस्थेच्या पूर्व परवानगीने सर्व भागांचे हस्तांतर दुसऱ्या सभासदाच्या नावावर हस्तांतरीत केल्यास (सदर नियम हा ज्या संस्थांचे नक्तमूल्य ऊणे नाही अशाच संस्थांना लागू होईल)

ड) राजीनामा दिल्याने किंवा सभासदत्व कमी करण्याची मागणी मान्य झाल्यास.

इ) सभासदास कायदा व नियमानुसार काढून टाकल्यास

फ) संस्थेच्या प्रचलित उपविधीतील तरतूदींनुसार सभासदत्वासंबंधीची किमान पात्रता धारण करीत नसल्यास.

२३ ब. **सभासदत्वासंबंधी अपात्रता :**

कोणतीही व्यक्ती खालील कारणास्तव संस्थेची सभासद होण्यास अपात्र राहील.

१) दिवाळखोर झाल्यास.

२) फौजदारी गुन्ह्यामध्ये शिक्षा झाली असल्यास.

३) संस्था करीत असलेला व्यवसाय करीत असल्यास.

४) कायमचे वेड लागल्यास.

२४. **सभासदास काढून टाकणे :**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील प्रचलित तरतूदीस अधिन राहून कोणत्याही सभासदास खालील कारणास्तव काढून टाकता येईल.

अ) त्याने जाणून बूजून संस्थेस फसविले असल्यास.

ब) तो दिवाळखोर किंवा कायद्याने अपात्र ठरल्यास.

क) त्याने संस्थेच्या हितास व हितसंबंधास तसेच संस्थेच्या प्रतिष्ठेस बाधा आणणारे कृत केल्यास.

ड) जर त्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम ४५ मधील तरतूदीच्या विरूद्ध वर्तन केल्यास.

इ) उपविधी क्र. (२३ अ व ब) नुसार अपात्रता झाल्यास.

फ) म.स.सं.अ. १९६० व नियम १९६१ च्या कलम २६ मधील तरतूदीनुसार.

२५. **भाग दाखला :**

१) प्रत्येक व्यक्ती सभासद म्हणून स्वीकृत झाल्यावर त्या व्यक्तीने घेतलेल्या भागाबद्दल भाग दाखला (विना शुल्क) मिळण्यास पात्र होईल. भाग दाखल्यावर घेतलेल्या भागांच्या उल्लेख असेल व त्यांचे अनुक्रमांक असतील, भाग दाखल्यावर संस्थेचे अध्यक्ष अथवा अधिकार दिलेले संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षऱ्या असतील. तसेच संस्थेची मोहोर (सील) त्यावर असेल.

२) जर कोणताही भाग हरवला, गहाळ झाला, नष्ट झाला तर त्याऐवजी संचालक मंडळाने ठरविलेल्या दराप्रमाणे शुल्क भरल्यानंतर दुसरा भाग दाखला दिला जावू शकेल. परंतु त्यासाठी सभासदाने भाग दाखला गहाळ झाल्याबाबतचा, हरवल्याबाबतचा, नष्ट झाल्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. तसेच सभासदाने त्यासाठी 'इंडेम्निटी बॉण्ड' देणे आवश्यक आहे.

२६. **नामांकन :**

सभासदास आपले पश्चात संस्थेतील हक्क, जबाबदारी घेणेसाठी वारसाची नेमणूक करता येईल. वारस नेमणेबाबत विहीत नमुन्यात अर्ज केला पाहिजे तसेच सभासद अर्जावरील नामांकन साक्षांकित असणे आवश्यक राहील व त्याची नोंद संस्थेचे नोंदणीकृत कार्यालयात ठेवलेल्या वारस नोंदणी रजिस्टरमध्ये झाली पाहिजे. जर वारस संस्थेचा सेवक असेल तर संचालक मंडळाची पूर्व परवानगी घेतली पाहिजे. कोणत्याही वेळी अगोदर नेमलेले वारस पत्र मागे घेवून नवीन वारस पत्र दाखल करता येईल. मात्र त्यासंबंधीची लेखी माहिती संस्थेस दिली पाहिजे. तसेच नवीन वारस पत्र दाखल करताना संचालक मंडळाने ठरविलेले शुल्क भरावे लागेल.

२७. **सभासदाचा मृत्यू**

सभासदाचे मृत्यूनंतर त्या सभासदाच्या भागांची रक्कम नेमलेल्या वारस / वारसास दिली पाहिजे. वारस नेमले नसेल तर संचालक मंडळास जो त्याचा कायदेशीर वारस आहे अथवा जो मृत्यू पावलेल्या सभासदाचा कायदेशीर प्रतिनिधी आहे. अशी खात्री असेल त्यास संस्था रक्कम देईल. अशावेळी संचालक मंडळाने ठरविलेल्या अटीनुसार योग्य तो इंडेम्निटी बॉण्ड द्यावा लागेल.

२८. **माजी सभासदांची जबाबदारी व मृत्यू पावलेल्या सभासदांची जबाबदारी :**

१) माजी सभासदांची अथवा मृत्यू पावलेल्या सभासदांची जबाबदारी संस्थेला येणे असलेल्या रकमेपोटी पुढीलप्रमाणे राहील.

अ) माजी सभासदांच्या बाबतीत ज्या दिवशी त्याचे सभासदत्व संपुष्टात आले किंवा मृत्यू पावलेल्या सभासदाचे बाबतीत त्याचा मृत्यूच्या दिनांकापासून पुढे दोन वर्षापर्यंत संस्थेने येणे रक्कम वसूलीपोटी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक राहील.

२) सभासदाची जबाबदारी ही त्याचे सभासदत्व संपुष्टात येण्याच्या दिवशीची व मृत्यू पावलेल्या सभासदाची मृत्यूच्या दिनांकाचे वेळी असलेली राहील.

२९. **सभासदांचे भाग भांडवल व ठेवींवरील संस्थेचा हक्क :**

सभासदाचे किंवा माजी सभासदाचे बाबतीत संस्थेचे येणे असेल तर त्यापोटी संस्थेत सभासदाचे असलेल्या भागांवर, लाभांशावर व ठेवींवर संस्थेचे प्रथम व सर्वश्रेष्ठ हक्क व बोजा राहील. संस्था केव्हाही त्याच्या जबाबदारीपोटी त्याला देय असलेली रक्कम वळती करून घेईल.

३०. **भाग वर्ग करणेबाबत**

एखाद्या सभासदास आपला एक किंवा अधिक भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाच्या नावे वर्ग करता येईल. मात्र ज्या सभासदाचे नावावर भाग वर्ग झाले असतील त्याचे नाव भागांच्या रजिस्टरमध्ये नोंदले गेले शिवाय वर्ग व्यवहार पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. तसेच यासाठी शुल्क म्हणून संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल ती रक्कम भरावी लागेल.

**खालील कारणासाठी भाग वर्ग करणे नाकारले जाईल.**

अ) जर सभासदावर कर्जाचा बोजा / जामिनकीची जबाबदारी असेल तर.



Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

R. No. KPR/HLE/ RSR/ (C)/1967 /2020 Dt.11-8-2020
Rukadi

ब) जर भाग वर्ग करणे संस्थेच्या हितसंबंधात हानीकारक असेल तर

क) ज्या व्यक्तीच्या नावावर भाग वर्ग करावयाचे असतील ती व्यक्ती उपविधी क्र. १० व ११ मधील कोणतीही तरतूदी पूर्ण करत नसेल तर.

ड) जर सभासदास धारण केलेले सर्व भाग वर्ग करावयाचे नसतील तर.

## इ सभा

### ३१. सर्व साधारण सभा :

१) सर्व साधारण सभेमध्ये उपस्थित राहण्यासाठी सर्वसाधारण सभासद आणि क्रियाशिल सभासद यांचा समावेश असेल.

२) कायदा व नियम यांना अधिन राहून संस्थेचे व्यवहाराबाबतचे सर्व अंतिम अधिकार सर्वसाधारण सभेकडे राहतील.

३) सर्वसाधारण सभा दोन प्रकारच्या असतील.

अ) वार्षिक साधारण सभा.

ब) विशेष साधारण सभा.

### ३२. सर्वसाधारण सभेची कामे व अधिकार

संस्थेचे संचालक मंडळ ठरावाद्वारे दरवर्षी दि. ३१ मार्च नंतरच्या दि. ३० सप्टेंबर पर्यंत मागील वर्षासाठी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करेल. सदर सभा कार्यक्षेत्रातील ठिकाणी खालील कामकाजाकरीता बोलावली जाईल.

१) मागील साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) संचालक मंडळाच्या संस्थेच्या कार्याबद्दलच्या वर्ष अखेरच्या अहवालावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.

३) वैधानिक लेखा परीक्षण झालेल्या ताळेबंद व नफा – तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.

४) वैधानिक लेखा परीक्षकांच्या लेखा परीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.

५) कायदा व नियम यास अनुसरुन नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.

६) पुढील वर्षाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि गतवर्षीच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.

७) उपविधी दुरूस्ती करणे.

८) सेवक आकृती बंधास मान्यता देणे तसेच सेवानियम मंजूर करणे.

९) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

१०) सामोपचार योजने अंतर्गत दिलेल्या कर्ज खात्यांची माहिती देणे.

११) नियम ४९ नुसार निर्लेखन कर्जास मान्यता देणे अथवा शिफारस करणे.

१२) निबंधकांनी जाहीर केलेल्या पॅनेलमधील पात्र वैधानिक लेखापरिक्षकाची चालू आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्याकामी नेमणूक करणे, लेखा परिक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे.

१३) प्रशिक्षण / कर्ज /गुंतवणूक/वसूली इत्यादी तत्सम विषयाबाबतच्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.

१४) तक्रार निवारण व तडजोड समिती स्थापन करणे, सदस्य व अध्यक्ष निवडणे व समितीची कार्यकक्षा ठरविणे. तसेच मागील आर्थिक वर्षातील समितीच्या कामकाजाची माहिती घेणे.

१५) ज्या त्या वेळी अंमलात असलेल्या नियमानुसार संस्थेचे वर्षाचे हिशोब पूर्ण करण्यासाठी नेमलेल्या तारखेनंतर

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi



येणाऱ्या पुढील तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत किंवा जास्तीत जास्त ३० सप्टेंबर पूर्वी संस्था आपल्या सभासदाची वार्षिक सर्व साधारण सभा बोलवील.

१६) पुढील वर्षासाठी कायदा/ नियम यामधील तरतुदीनुसार बाहेरील कर्ज मर्यादा व जबाबदारी निश्चित करणे

१७) मागील लगतच्या वर्षाच्या लेखा परिक्षणाचा दोष दुरूस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे

१८) वार्षिक सभा मुदतीत न घेणाऱ्या जबाबदार समिती सदस्यास पाच वर्षासाठी अपात्र आणि व्यवस्थापनातील अधिकारी यास रू. ५०००/- दंडाची तरतूद अधिनियमात आहे. याची माहिती देणे.

१९) सभासदांची हकालपट्टी करणे.

२०) क्रियाशिल तसेच नाममात्र सभासदासंबंधी निकषपूर्ततेची माहिती सादर करणे.

३३. **विशेष साधारण सभा**

संचालक मंडळाने ठेवलेले अन्य कोणतेही विषय.

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळाच्या आदेशानुसार केव्हाही अथवा निबंधक यांचेकडील सूचना मिळालेपासून अथवा १०० किंवा एकूण सभासदांच्या १/५ यापेक्षा जास्त असेल त्या सभासदांच्या सहीने आलेल्या लेखी विनंतीनुसार ३० दिवसांमध्ये विशेष साधारण सभा बोलवतील. विशेष साधारण सभेमध्ये फक्त सूचनेमध्ये दिलेल्या विषयांवर विचार केला जाईल.

३४. **वार्षिक साधारण सभा व विशेष साधारण सभेची सूचना :**

१) वार्षिक साधारण सभा १४ दिवस अगोदर लेखी स्वरूपात सर्व सभासदांना सूचना देवून बोलावली जाईल.

२) विशेष साधारण सभा ७ दिवस अगोदर लेखी स्वरूपात सर्व सभासदांना सूचना देवून बोलावली जाईल.

३) वार्षिक /विशेष साधारण सभेची लिखित सूचना उपरोक्त मुदतीमध्ये सभासदाचे संस्थेकडे नोंदविलेल्या पत्त्यावर तसेच निबंधकांकडे पाठविणे बंधनकारक राहील. तसेच संस्थेच्या वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला मागिल आर्थिक वर्षाचा ताळेबंद व नफा तोटा पत्रक, संचालक मंडळाचा वार्षिक अहवाल तसेच संचालक मंडळाची निवडणूक असल्यास त्यासंबंधीची माहिती व उपविधी दुरूस्ती असल्यास त्यासंबंधीची विहित नमुन्यातील सूचना संस्थेच्या नोंदणीकृत कार्यालय अथवा नजिकच्या शाखेमध्ये सभासदास कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पाहण्यास उपलब्ध होईल.

४) साधारण सभेच्या सूचनेमध्ये सभेची जागा, तारीख व वेळ यांचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. तसेच सूचनेमध्ये गणपूर्ती अभावी तहकूब झालेल्या सभेची तारीख, जागा व वेळ याचाही उल्लेख असला पाहिजे.

५) कोणत्याही साधारण सभेची सूचना मिळाली नाही, हे सभा तहकूब करण्यासाठी अथवा पुढे ढकलणेसाठी पुरेसे कारण ठरणार नाही.

६) साधारण सभेची सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने दिली जाईल.

३५. **वार्षिक साधारण सभा व विशेष साधारण सभेची गणपूर्ती :**

१) कोणत्याही वार्षिक /विशेष साधारण सभेस एकूण १/५ सभासद किंवा १०० सभासद यापैकी जी संख्या कमी असेल इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल.

२) वार्षिक /विशेष साधारण सभेचे कामकाज सभेच्या वेळेस गणपूर्ती न झाल्यास चालविण्यात येणार नाही.

३) ठरविण्यात आलेल्या वेळेस गणपूर्ती झाली नाही अशी वार्षिक साधारण सभा तहकूब करण्यात येईल आणि ती

R. No. KPR/HLE/ RSR/ CR/1967 /2000 Dt.14-8-2000
Rukadi

अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

४) वार्षिक /विशेष सभेच्या दरम्यान कोणत्याही वेळी असे लक्षात आले की, गणपूर्तीसाठी आवश्यक तेवढे सभासद उपस्थित नाही तर अध्यक्ष किंवा सभेचे अध्यक्ष स्थान भूषविणारी व्यक्ती अशी सभा तहकूब करेल आणि उर्वरित कामकाज नेहमीच्या पद्धतीने तहकूब सभेत पूर्ण केले जाईल.

५) तहकूब केलेली सभा विशेष साधारण सभा त्याचदिवशी अथवा अन्य कोणत्याही दिवशी, कोणत्याही ठिकाणी व कोणत्याही वेळेस ७ दिवसांचे आत अध्यक्ष ठरवतील त्याचप्रमाणे घेण्यात येईल.

६) तहकूब झालेल्या सभेमध्ये सभेच्या सूचनेवर असलेल्या विषयांव्यतिरिक्त कोणत्याही विषयाचे कामकाज चालविले जाणार नाही.

७) सभासदांनी केलेल्या विनंतीनुसार विशेष साधारण सभा बोलावली असेल तर जेवढ्या सभासदांच्या सह्या विनंतीपत्रावर आहेत त्यांचेपैकी किमान १/२ सभासद उपस्थित असल्यास गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल.

३६. **साधारण सभेचे अध्यक्ष :**

संचालक मंडळाचे अध्यक्ष साधारण सभेचे अध्यक्ष असतील. त्यांचे गैरहजेरीमध्ये उपाध्यक्ष आणि दोघांचेही गैरहजेरीत हजर असलेले व मतदानाचा हक्क असलेले सभासदांपैकी एकाची निवड सभेच्या अध्यक्षपदासाठी करण्यात येईल.

३७. **ठराव :**

ज्याबाबत विशिष्ट तरतुदी कायदा, नियम व उपविधी असतील असे विषय वगळता इतर बाबतीत ठराव मताधिक्याने मंजूर करण्यात येईल.

३८. **साधारण सभेचे इतिवृत्त :**

साधारण सभेचे इतिवृत्त सभा झाल्यापासून १५ दिवसांचे आत त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. सदर इतिवृत्तावर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सह्या कराव्यात. अशा प्रकारचे सह्या केलेले इतिवृत्त सभेमध्ये झालेल्या कामकाजाचा अचूक पुरावा म्हणून समजले जाईल. सदर इतिवृत्त साधारण सभा झाल्यानंतर ४५ दिवसांचे आत होणाऱ्या संचालक मंडळ सभेमध्ये नोंद घेण्यासाठी ठेवण्यात यावे व त्याची एक प्रमाणित केलेली प्रत नोंद घेतल्यानंतर संबंधित निबंधकांकडे १५ दिवसांच्या आत पाठविण्यात यावी.

## ई संचालक मंडळ

३९. **संचालक मंडळ :**

संचालक मंडळ १५ सदस्यांचे राहील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

१. संस्थेच्या क्रियाशील सभासदांतून निवडलेले

(सर्वसाधारण गटातून)

| | | |
|---|---|---|
| २. | अनुसूचित जाती/जमाती सभासदांसाठी (राखीव) | १ |
| ३. | महिलांसाठी (राखीव) | २ |
| ४. | इतर मागास प्रवर्ग (राखीव) | १ |
| ५. | भटक्या विमुक्त जाती / जमाती व विशेष मागास प्रवर्ग (राखीव) | १ |
| | एकूण | ११ |
| ६. | तज्ञ संचालक (स्विकृतीने जास्तीत जास्त) | २ |
| ७. | कार्यलक्षी संचालक (मुख्य कार्यकारी अधिकारी) | १ |
| | एकूण | १४ |

१) संचालक मंडळावर संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांस कार्यलक्षी संचालक म्हणून स्विकृत केले जाईल त्यांना पदाधिकारी निवडणूकीमध्ये मतदानाचा कोणताही हक्क राहणार नाही, मात्र संचालक मंडळ सभेमध्ये मत व्यक्त करण्याचा अधिकार असेल.

२) तज्ञ संचालकांना पदाधिकारी निवडणूकीमध्ये मतदान करण्याचा हक्क राहणार नाही. मात्र संचालक मंडळ सभेमध्ये मत व्यक्त करण्याचा अधिकार राहील.

३) तज्ञ संचालकांस जास्तीत जास्त तीन सहकारी संस्थावर काम करता येईल, त्यापेक्षा ज्यादा सहकारी संस्थावर काम करावयाचे असल्यास संबंधित निबंधकांची मान्यता घेणे अनिवार्य असेल.

४) तज्ञ संचालकाने प्रत्येक सहकार वर्षात संचालक मंडळाच्या झालेल्या एकूण सभांपैकी किमान ५०% सभांना उपस्थित असणे अनिवार्य राहील.

५) संचालक मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील.

६) पदाधिकारी निवडणूकीसाठी सभेच्या मतदानासाठी संचालकांची (फक्त तज्ञ व कार्यलक्षी संचालक वगळून) गणपूर्ती ५० टक्के पेक्षा जास्त राहील.

७) संस्थेच्या कामकाजाच्या संचालक मंडळाच्या सभेसाठी ( फक्त कार्यलक्षी संचालक वगळून ) गणपूर्ती ५० टक्के पेक्षा जास्त राहील.

टीप : पदाधिकारी निवडीसाठी पात्र संचालक मंडळ (समिती) सदस्य संख्या बारा पेक्षा कमी अथवा अधिक करण्याचे अधिकार पतसंस्थेला राहतील परंतु २१ पेक्षा जास्त संचालक मंडळ सदस्य असणार नाहीत आणि १७ पेक्षा जास्त सदस्यसंख्या असल्यास कार्यलक्षी संचालक २ राहतील.

३९ अ **संचालक मंडळ रिक्त जागा भरणे .**

कायदा व नियम यातील तरतूदी नुसार संचालक मंडळाची रिक्त जागा भरण्यात येईल.

४०. **अध्यक्ष व उपाध्यक्ष**

अ) संचालक मंडळ निवडणूकीनंतर संस्थेच्या संचालक मंडळाची पहिली सभा निवडणूक निकालाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत घेतली पाहिजे.



Rajarshi Shahu Arts & Comm. College, Rukadi

R. No. KPR/HLE/ RSR/CR/1967/ 2000 Dt. 14.8.2000

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi



ब) अध्यक्ष / उपाध्यक्ष निवडीसाठी संचालक मंडळाच्या सभेचे कामकाज निवडणूक प्राधिकरण किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

क) संचालक मंडळाच्या सर्व सभांचे अध्यक्षपद अध्यक्षच भूषवतील. अध्यक्षांच्या गैरहजेरीत सभांचे अध्यक्षपद उपाध्यक्ष भूषवतील व दोघांच्याही गैरहजेरीत संचालक मंडळातील सदस्य आपल्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतील.

ड) सभेच्या अध्यक्षांना स्वत:च्या मताव्यतिरिक्त निर्णायक मत राहील. सदर निर्णायक मताचा वापर समान मते पडल्यास करता येईल.

इ) तज्ञ संचालक / कार्यलक्षी संचालक यांना अध्यक्ष / उपाध्यक्षांच्या निवडणूकीमध्ये मत देण्याचा अधिकार राहणार नाही.

ई) अध्यक्ष / उपाध्यक्षांचा कालावधी संचालक मंडळाचे कार्यकालाएवढा राहील.

४१. **अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे अधिकार व कामे :**

१) अध्यक्षांना खालील अधिकार व कार्ये पार पाडावी लागतील.

अ) साधारण सभा, संचालक मंडळ सभा व कार्यकारी समिती सभा यांचे अध्यक्षपद भूषविणे.

ब) अध्यक्षपद भूषविलेल्या सर्व सभांच्या इतिवृत्तावर सह्या करणे.

क) एखाद्या ठरावावर सभेमध्ये समान मते पडल्यास अशा ठरावावर निर्णायक मत देणे (कास्टिंग मत).

ड) संचालक मंडळ, कार्यकारी समिती व इतर सभांचे आयोजन करणे.

इ) स्वत: असलेल्या अधिकारांमधील काही अधिकार उपाध्यक्षांना प्रदान करणे.

२) उपाध्यक्षांना अध्यक्षांच्या गैरहजेरीमध्ये त्यांचे सर्व उपरोक्त कामकाज पार पाडावे लागेल.

४२. **संचालक मंडळाचे इतिवृत्त :**

संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. सदर इतिवृत्तावर पुढील संचालक मंडळ सभेच्या अगोदर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सह्या कराव्यात व पुढील सभेत इतिवृत्त कायम करण्यात यावे. अशा प्रकारचे सह्या केलेले व मोहोर केलेले इतिवृत्त सभेमध्ये झालेल्या कामकाजाचा अचूक पुरावा म्हणून समजले जाईल.

४३. **संचालक मंडळाचे अधिकार, कार्ये आणि जबाबदाऱ्या :**

१) संचालक मंडळास संस्थेचे कामकाज विविध कायद्याअंतर्गत सुरळित व व्यवस्थित पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार आहेत.

२) कोणत्याही सर्वसाधारण अधिकारांना बाधा न आणता संचालक मंडळास असलेले अधिकार खालीलप्रमाणे–

१) सभासदत्व मंजूर करणे.

२) संस्थेसाठी संघटनात्मक उद्दिष्टे ठरविणे व सदर उद्दिष्टे पूर्ण करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.

३) संस्थेच्या व्यवहारांची कालनिहाय माहिती घेणे.

Rajarshi Shahu Arts & Comm. College
Rukadi



४) मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे व त्यांना काढून टाकणे.

५) कर्मचाऱ्यांची नेमणूक, त्यांना द्यावयाचे पगार व भत्ते, सेवेच्या अटी व शर्ती, शिस्तभंगाची कारवाई इत्यादीच्या नियंत्रणासाठी निर्णय घेणे.

६) लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील दोष दुरूस्ती अहवालाचा विचार करणे व सदर अहवाल साधारण सभेपुढे ठेवणे.

७) स्थावर मालमत्ता खरेदी करणे व नको असलेल्या जागांची विल्हेवाट लावणे.

८) इतर सहकारी संस्थाच्या सभासदत्वासंबंधी आढावा घेणे.

९) निधींची उभारणी करणे.

१०) वार्षिक व पुरवणी अंदाज पत्रकाचा आढावा घेणे.

११) सभासदांना कर्ज मंजूर करणे.

१२) संस्थेचे निधी मान्यता प्राप्त ठिकाणी गुंतवणे.

१३) शाखाविस्तार, बँकिंग करस्पॉन्डन्स ॲन्ड बँकिंग फॅसिलिटेटर, प्रशासकीय कार्यालय व ए.टी.एम. केंद्रासाठीच्या प्रस्तावांवर विचार करणे.

१४) सहकार खात्याच्या वेळोवेळी येणाऱ्या आदेशानुसार ठेवी व कर्जावरील व्याजदर निश्चित करणे.

१५) संचालक मंडळाच्या निवडणूकीसंदर्भात कायद्यातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती पूर्तता वेळेवर करणे.

१६) सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार व्यवसाय करण्यासाठी विविध धोरणे व नियंत्रणे तयार करणे.

१७) कायदा, नियम व उपविधी यानुसार आवश्यक असलेल्या तसेच साधारण सभेने अधिकार प्रदान केलेल्या सर्व बाबींवर कार्यवाही करणे व सर्व कामकाज पार पाडणे.

१८) कोणत्याही कर्जाची पुर्नबांधणी करणे आणि सवलतीबाबत निर्णय घेणे.

१९) सभासद, संचालक व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबत आराखडा तयार करणे व त्यानुसार कार्यवाही करणे.

२०) संस्थेचे आर्थिक कामकाजामधील नोंदी घेणे.

२१) कर्ज थकबाकीचा आढावा घेणे आणि वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करणे.

२२) संस्थेची ठेवी व बाहेरील कर्ज मर्यादा उपविधीतील तरतूदीपेक्षा जास्त असणार नाही याची दक्षता घेणे.

२३) शाखा विस्ताराबाबत निर्णय घेणे.

२४) कर्ज वितरणासाठीची कर्जदाराच्या कागदपत्रांची तपासणी करणे अथवा त्यासंबंधीची व्यवस्था निर्माण करणे.

२५) कर्जप्रकार आणि कर्जदारनिहाय येणे कर्ज बाकी त्यापैकी थकबाकी व अनुत्पादक कर्ज खात्यांची विगतवारी करणे. तसेच वसूलीसाठी नियोजन करणे.

२६) अनुत्पादक कर्ज व मालमत्ता यांचे निकष विचारात घेऊन वस्तुस्थिती दर्शक आर्थिक पत्रके तयारकरणे.

२७) कायदा/ नियम तरतुदींनुसार प्रतिवर्षी विहित मुदत व नमुन्यामध्ये क्रियाशील सभासदांची यादी प्रसिद्ध करणे.

Arts & Comm. College Rukadi

**४४. संचालक पदासाठी अपात्र होणे :**

कोणताही सभासद संस्थेचा संचालक म्हणून निवडून येण्यास अथवा संचालक होण्यास अपात्र ठरेल; जर असा सभासद -

१) न्यायालयाने नादार म्हणून दोषी ठरविल्यास अथवा मानसिक दृष्ट्या कायमचा वेडा ठरविला असल्यास.

२) संस्था व्यवसायाच्या कोणत्याही करारामध्ये संबंधित आहे व कोणत्याही करारान्वये त्यास फायदा होत असेल तर.

३) फौजदारी गुन्ह्यामध्ये दोषी ठरविण्यात आले असेल आणि त्यास शिक्षा झाली असल्यास.

४) संस्थेतील अशा कोणत्याही फायदा होणाऱ्या पदावर असेल तर. राज्य सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या धोरणानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा पूर्ण वेळ सेवक किंवा कार्यरत संचालक जरी संचालक मंडळ सदस्य असला तरी अशा पदांकरीता अपात्र ठरेल.

५) अन्य कोणत्याही नागरी सहकारी पतसंस्थेचा संचालक असल्यास (तज्ञ संचालकाचे बाबतीत वगळून).

६) तो संस्थेचा क्रियाशील सभासद नसल्यास.

७) संस्थेतर्फे करण्यात येणाऱ्या व्यवहारांमध्ये कोणतेही हितसंबंध असल्यास आणि त्यामुळे संस्थेचे आर्थिक नुकसान होत असल्यास.

८) त्यांचा व त्यांच्या कुटुंबियांच्या मालकीची संस्थेने वाजवी बाजार भाव किंमतीपेक्षा अधिक दराने भाडेतत्वावर किंवा मालकी हक्कावर स्थावर मालमत्ता घेतल्यास.

९) उपविधीतील तरतूदीनुसार थकबाकीदार झाल्यास.

१०) कायद्यानुसार त्यास सभासद म्हणून काढून टाकले असल्यास.

११) सततच्या तीन संचालक मंडळ सभांना तो अनुपस्थित असल्यास व त्याची अनुपस्थिती संचालक मंडळास न कळविल्यास.

१२) संचालकाचे प्रत्येक कार्यकालात किमान सलग तीन दिवसांचे मान्यता प्राप्त संस्थेतून प्रशिक्षण न घेतल्यास.

१३) सहकार खात्याने संचालक पात्रतेसाठी खालील प्रमाणे ठरविलेल्या ठेवीबाबतच्या पूर्तता न केल्यास.

| क्र. | नागरी विभागाचा प्रकार | कार्यक्षेत्र | संचालकाने ठेवावयाची ठेव रक्कम |
|---|---|---|---|
| १. | राज्य | राज्यस्तर पतसंस्था (एकापेक्षा अधिक विभाग कार्यक्षेत्र) | दिड लाख |
| २. | विभाग | विभागस्तर पतसंस्था (एकविभाग /एकापेक्षा अधिक जिल्हे कार्यक्षेत्र) | ७५ हजार |
| ३. | बृहन्मुंबई | जिल्हा कार्यक्षेत्र | ७५ हजार |
| ४. | बृहन्मुंबई | एक वार्ड / प्रभाग | ५० हजार |
| ५. | जिल्हा | जिल्हा | ५० हजार |
| ६. | महानगरपालिका असलेली शहरे | एक वॉर्ड/ प्रमाण | ४० हजार |
| ७. | तालुका | तालुका | २५ हजार |

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | नगर पालिका असलेली शहरे | एक त दोन वॉर्ड / प्रभाग | २५ हजार |
| ९. | अन्य नागरी / ग्रामीण शहरे | एक गाव | २५ हजार |

४५. **संचालक म्हणून निवडणूक लढविण्यास पात्रता :**

सभासदाने खालील अटी पूर्ण केल्याशिवाय त्यास संचालक पदासाठीची निवडणूक लढविण्यास पात्र ठरविले जाणार नाही.

१) संचालक मंडळाची निवडणूक प्राथमिक मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नाव समाविष्ठ असणे आवश्यक आहे.

२) सहकार कायदा / नियम/ उपविधीनुसार अपात्रता धारण केली नसली पाहिजे.

४६. **संचालक मंडळावरील रिक्त जागा :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार संचालक मंडळावरील रिक्त जागा निवडणूक अथवा नियुक्तीने भरणेत येईल.

४७. **संचालक मंडळ सभा :**

१) संचालक मंडळापुढे चर्चेसाठी आलेल्या विषयावर बहुमताने निर्णय होतील. जेथे समान मते पडतील तेथे सदर सभेच्या अध्यक्षास एक निर्णायक मत (कास्टींग वोट) देण्याचा अधिकार राहील.

२) संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त त्या कारणासाठी ठेवलेल्या इतिवृत्त पुस्तकात नोंदणे आवश्यक आहे.

३) संस्थेच्या अध्यक्षांच्या परवानगीने मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळ सभा बोलवतील.

४) महिन्यातून किमान एकदा संचालक मंडळाची सभा होणे आवश्यक आहे.

५) संचालक मंडळाची सभा शक्यतो संस्थेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयात अथवा संस्थेच्या कोणत्याही शाखेमध्ये ठेवण्यात यावी.

६) संस्थेचे अध्यक्ष हे संचालक मंडळ सभेचे अध्यक्ष राहतील. त्यांच्या अनुपस्थितीत संस्थेचे उपाध्यक्ष हे सभेचे अध्यक्ष राहतील. वरील दोघांच्या अनुपस्थितीत सदर संचालक मंडळ सभेस उपस्थित असणारे संचालक त्यांचेमधून एकाची त्या सभेकरीता अध्यक्ष म्हणून निवड करतील.

७) संचालक मंडळ सभेची नोटीस ७ दिवसांच्या पूर्व सूचनेने पाठविणे आवश्यक आहे.

८) पदाधिकारी निवडीच्या संचालक मंडळ सभेच्या गणपूर्तीसाठी (उपविधीमधील एकूण मतदानासाठी पात्र संचालक संख्येनुसार) ५० टक्के पेक्षा जास्त पात्र संचालक हजर असणे आवश्यक आहे तर इतर संचालक मंडळ सभेसाठी (कार्यलक्षी संचालक वगळता इतर सर्व पात्र संचालक संख्येनुसार) ५० टक्के पेक्षा जास्त पात्र संचालक हजर असणे गणपूर्तीसाठी आवश्यक आहे.

९) अध्यक्ष हे सर्व संचालक व उपसमिती यांचे अध्यक्ष राहतील.

४८. **संचालक मंडळाच्या उपसमित्या :**

तक्रार निवारण व तडतोड समिती व्यतिरिक्त संस्थेला जास्तीत जास्त पाच उपसमित्या स्थापन करता येतील. त्यापैकी ''लेखापरिक्षण समिती'' आणि ''कर्ज वसूली समिती'' या दोन उपसमित्या अनिवार्य असतील. प्रत्येक उपसमितीची सदस्य संख्या पाच पेक्षा अधिक असणार नाही. तसेच प्रत्येक समितीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष व उपाध्यक्ष राहतील. समिती सदस्या व्यतिरिक्त मुख्य कार्यकारी

अधिकारी हे प्रत्येक समितीचे पदसिद्ध सचिव असतील. सर्व उपसमित्यांचे इतिवृत्तास नजिकच्या संचालक मंडळ सभेत मान्यता घेणे आवश्यक राहील.

४९. **तक्रार निवारण व तडजोड समिती**

सभासद आणि संस्था यांचेमध्ये वेळोवेळी निर्माण होणारे वाद, तक्रारी यांचे निराकरण करणेसाठी तसेच संस्थेचे धकबाकीदार आणि संस्था यांचे मधील वाद मिटविण्यासाठी / तडजोड करणेसाठी सर्वसाधारण सभा एका तक्रार निवारण व तडजोड समितीची स्थापना करेल. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

अ) तीन सदस्य संस्थेच्या क्रियाशील सभासदांमधून

ब ) समिती सचिव - मुख्य कार्यकारी अधिकारी.

टीप - सदर समितीचे तीन ही सदस्य सहकारी संस्थांच्या कामकाजाबाबत प्रत्यक्ष अनुभव असणारे क्रियाशील सभासदामधून नियुक्त केले जातील. तसेच सदर समितीसमोर येणाऱ्या विषयांमध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे समिती सदस्यांचा हितसंबंध असणार नाही. सदर समिती सदस्यांची व समितीच्या अध्यक्षांची नियुक्ती तसेच कार्यकक्षा वार्षिक सभेमध्ये निश्चित केली जाईल. सदर समितीची सभा महिन्यातून किमान एकदा होईल.

सदर समितीचे कर्तव्य म्हणजे त्यांच्यासमोर आलेल्या वादामध्ये संस्थेस योग्य तो सल्ला देण्याबरोबरच कायदा / नियम, संस्थेचे उपविधी व सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच संस्था आणि सहकार क्षेत्रातील रूढी यांचा विचार करून सभासद व संस्था यांचेमध्ये तडजोड घडवून आणणे हे राहील. सदर समितीचे इतिवृत्तास नजिकचे संचालक मंडळ सभेत मान्यता घेणे बंधनकारक राहील. तसेच तक्रार निवारण व तडजोड समितीचे वर्षभरातील कामकाजाचा लेखाजोखा वार्षिक साधारण सभेपुढे मांडण्यात येईल.

५०. **मुख्य कार्यकारी अधिकारी, त्यांचे अधिकार व त्यांची कर्तव्ये:**

संचालक मंडळ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नेमणूक किमान अर्हता प्राप्त करीत असलेल्या व्यक्ती करेल. तो संस्थेचा पूर्ण वेळ सेवक असून संचालक मंडळास त्यांच्या कामकाबात वेळोवेळी मदत करेल. मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाचा पदसिद्ध पदाधिकारी राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली राहील. तसेच संचालक मंडळाच्या मार्गदर्शनानुसार तो आपले पुढील अधिकार व कर्तव्य पार पाडेल.

१) संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनावर लक्ष ठेवणे.

२) संस्थेच्या वतीने संस्थेची खाती चालविणे तसेच रोखतेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची सुविधा उपलब्ध करणे.

३) संस्थेच्या वतीने आवश्यक त्या सर्व कागदपत्रांवर पत्रांवर सह्या करणे.

४) संस्थेच्या वतीने आवश्यक ती सर्व हिशेबाची पुस्तके ठेवणे, आवश्यक ते सर्व रेकॉर्ड तयार ठेवणे, कायदा, नियम आणि उपविधीनुसार आवश्यक त्या ठिकाणी विहित नमुन्यातील विवरण पत्रके दाखल करणे यासंबंधीची सर्व योजना करणे.

५) संचालक मंडळ सभा बोलवणे आणि सर्व उपसमित्यांच्या सभा कलम ५३ चे उपनियम (१) नुसार बोलवणे आणि सदर सभांचे इतिवृत्त तयार करणे.

६) संचालक मंडळाच्या संमतीने संस्थेतील विविध जागांकरीता नेमणूका करणे.

७) संस्थेची उद्दिष्ट, विविध धोरणे तसेच भविष्यकाळासंबंधी नियोजन करण्याकरीता संचालक मंडळास मदत करणे.

८) संचालक मंडळास वेळोवेळी आवश्यक ती माहिती देणे तसेच संस्थेच्या कामकाजाविषयी कायदा / उपविधीतील तरतुदीनुसार व सहकार खात्याने दिलेल्या विवरण पत्राची वेळोवेळी माहिती देणे व सहकार खात्याच्या वार्षिक निरीक्षणासंबंधी माहिती देणे.

९) संचालक मंडळाच्या सभेमध्ये ठेवण्यात येणाऱ्या प्रत्येक विषयाबाबत स्वत:चे स्पष्ट मत, सूचना आणि सल्ला लेखी स्वरूपात देणे.

१०) संस्थेच्या वतीने न्यायालयीन प्रक्रियेसाठी वकीलांची नेमणूक करणे.

११) आर्थिक वर्ष संपल्यावर ४५ दिवसांमध्ये वार्षिक अहवाल, हिशेबाची परिपत्रके संचालक मंडळाच्या संमतीसाठी तयार करणे.

१२) संचालक मंडळाच्या परवानगीने स्वत:चे अधिकाराचे संस्थेच्या इतर अधिकाऱ्यांना हस्तांतर करणे.

१३) मुख्य कार्यकारी अधिकारी स्वत:ला आवश्यक वाटतील असे काही अधिकार संस्थेतील इतर अधिकाऱ्यांना संस्थेच्या संचालक मंडळाच्या पूर्व परवानगीने प्रदान करू शकतील.

१४) तक्रार निवारण व तडजोड समितीचा सचिव म्हणून कामकाज पहाणे.

१५) सर्व साधारण सभा बोलाविणे. आणि सभेचा व्यवहार सांभाळणे तसेच सभेपुढे सर्व आर्थिक विवरण पत्रे सादर करणे, लेखा परिक्षण अहवाल व दोष दुरूस्ती अहवाल सादर करणे.

५१. **ठेवी :**

१) ठेवींचे व्याजदर संचालक मंडळ सभेमध्ये ए.बी. आर. आणि ए. एल. आर. यांचा वेळोवेळी आढावा घेऊन ठरवले जातील आणि तेच व्याजदर अंमलात राहतील. संचालक मंडळाच्या मंजूरीने त्या त्या वेळेच्या निर्णयानुसार वेगवेगळ्या व्याजदराने ठेवी स्वीकारता येतील.

२) अशा ठेवी या चालू खाती, बचत खाती, रिकरिंग खाती, पिग्मी, पुनर्गतवणूक खाती अथवा एखाद्या विशिष्ट योजनेनुसार येणारी खाती इत्यादी प्रकारात स्विकारता येतील. परंतु अशी खाती स्वीकारताना के.वाय.सी. नियमावलीचे पालन करणे आवश्यक आहे.

३) अशी खाती उघडण्यासाठी व ती नियंत्रित करणेसाठी संस्थेला या संदर्भात सहकार खात्याने वेळोवेळी दिलेल्या सूचना, मार्गदर्शक तत्वे आणि आदेश यांचे पालन करणे आवश्यक आहे.

५२. **गुंतवणूक :**

**अ) वैधानिक गुंतवणूक**

**१) रोख तरलता प्रमाण (C.R.R.)**

पतसंस्था स्वत:हून राखीव रक्कम म्हणून प्रत्येक मागील तिमाही अखेरच्या एकूण ठेवींच्या एक टक्क्यापेक्षा कमी नसेल इतकी रक्कम लगतचे प्रत्येक तिमाहीसाठी दैनंदिन पद्धतीवर रोख तरलता प्रमाण / कॅश रिझर्व्ह रेशो (CRR) म्हणून ठेवेल.

रोख तरलता रक्कम राज्य सहकारी / जिल्हा मध्यवर्ती बँकामध्ये चालू/बचत/१५ दिवसांपेक्षा जास्त नाही एवढ्या मुदतीच्या अल्पमुदत ठेवीमध्ये किंवा राज्य शासनाने, नियमांद्वारे किंवा त्याबाबतीत दिलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी दिलेल्या कोणत्याही प्रकारामध्ये गुंतवली जाईल. गुंतवणूक केलेल्या बँकांचा मागील सतत तीन वर्षांचा लेखापरिक्षण वर्ग 'अ' अथवा रिझर्व्ह बँकेने केलेल्या अद्ययावत तपासणी नुसार ग्रेड 'ए' असणे आवश्यक आहे. संस्थेने बँकांच्या वरील वर्गवारीबाबत खात्री करणे अनिवार्य असेल.

Shahu Arts & Comm. College Rukadi



राखीव रोख तरलता निधीबाबत संस्थेने दैनंदिन पद्धतीवर आवश्यक त्या नोंदी ठेवावयाच्या असून संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दररोज त्या प्रमाणित करणे आवश्यक आहे. तसेच सदरची माहिती वेळोवेळीच्या संचालक मंडळ सभेमध्ये सादर करणे बंधनकारक राहील. त्यामध्ये संस्थेच्या रोख शिल्लकेचा समावेश करण्यात येईल. तसेच प्रत्यक्षात ठेवलेल्या दैनंदिन रोख तरलतेच्या रकमेमध्ये एकूण रोख शिल्लक ५०% पेक्षा जास्त असणार नाही.

**टीप – उदाहरणार्थ – जून अखेरची तिमाही संपल्यानंतर जून तिमाही अखेर असणाऱ्या एकूण ठेवींच्या किमान एक टक्के प्रमाणे येणारी रक्कम कॅश रिझर्व्ह रेशो म्हणून जुलै ते सप्टेंबर या तिमाहीमध्ये दैनंदिन पद्धतीवर ठेवावयाची आहे. अशा प्रकारे प्रत्येक तिमाही अखेरच्या एकूण ठेवींवर किमान १% प्रमाणे ठेवावयाची रक्कम काढावयाची असून ती लगतचे तिमाहीमध्ये दैनंदिन पद्धतीवर ठेवावयाची आहे.**

२) वैधानिक तरलता निधी (S.L.R.)

पतसंस्था स्वत:हून वैधानिक तरलता निधी म्हणून प्रत्येक मागील तिमाही अखेरच्या एकूण ठेवींच्या वीस टक्क्यांपेक्षा कमी नसेल इतकी रक्कम लगतचे तिमाहीसाठी दैनंदिन पद्धतीवर ठेवणे आवश्यक राहील.

सदर वैधानिक तरलता निधी रक्कम राज्य सहकारी बँका / जिल्हा मध्यवर्ती बँक यांचे कडील मुदत ठेवींमध्ये किंवा राज्य शासनाने, नियमांद्वारे किंवा त्याबाबतीत दिलेल्या सर्वसाधार किंवा विशेष आदेशाद्वारे परवानगी दिलेल्या कोणत्याही प्रकारामध्ये गुंतवावी लागेल. गुंतवणूक केलेल्या बँकांचा मागील सतत तीन वर्षाचा लेखापरिक्षण वर्ग 'अ' असावा अथवा रिझर्व्ह बँकेने केलेल्या अद्ययावत तपासणीनुसार वर्गवारी ग्रेड 'ए' आवश्यक आहे.

वैधानिक तरलता निधी बाबत संस्थेने दैनंदिन पद्धतीवर आवश्यक त्या नोंदी ठेवावयाच्या असून संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने दररोज प्रमाणित करणे आवश्यक आहे. तसेच सदरची माहिती वेळोवेळीचे संचालक मंडळ सभेमध्ये सादर करणे बंधनकारक राहील

रोख तरलता व वैधानिक तरलतेपोटी निर्धारीत प्रमाणात गुंतवणूक दैनंदिन पद्धतीवर असणे बंधनकारक राहील.

सदर निर्धारित प्रमाणापेक्षा असणाऱ्या अतिरिक्त गुंतवणूकीवर संस्थेला कर्ज रक्कम काढण्यास मुभा राहील.

निर्धारीत प्रमाणामधील अशा गुंतवणुकीवर कर्ज काढता येणार नाही मात्र तसे केल्यास संस्थेने निर्धारीत प्रमाण राखले नाही असे समजण्यात येईल.

टीप – उदाहरणार्थ – डिसेंबर अखेरची तिमाही संपल्यानंतर डिसेंबर तिमाही अखेर असणाऱ्या एकूण ठेवींच्या किमान वीस टक्के प्रमाणे येणारी रक्कम वैधानिक तरलता निधी म्हणून जानेवारी ते मार्च या तिमाही मध्ये दैनंदिन पद्धतीवर ठेवावयाची आहे. अशा प्रकारे प्रत्येक तिमाही अखेरच्या एकूण ठेवींवर किमान २०% प्रमाणे ठेवावयाची रक्कम काढावयाची असून ती लगतचे तिमाहीमध्ये दैनंदिन पद्धतीवर ठेवावयाची आहे. राखीव निधीची गुंतवणूक ही वैधानिक गुंतवणूक असल्याने ती वैधानिक तरलता गुंतवणूकीमध्ये अंतर्भूत करता येईल. मात्र त्या व्यतिरिक्त वरील नमूद पात्र गुंतवणूकी व्यतिरिक्त अन्य कोणतीही गुंतवणूक वैधानिक तरलता गुंतवणूक म्हणून ग्राह्य धरली जाणार नाही.

३) इतर गुंतवणूक –

अ) वरील रोख राखीव प्रमाण व वैधानिक तरलता निधी या पात्र गुंतवणूकीव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम गुंतवताना सदर गुंतवणूक करण्याचे दिवशी मागील लागोपाट तीन वर्षात अ वर्ग मिळालेली तसेच रिझर्व्ह बँकेचे ग्रेडेशन ए असलेले राज्यसहकारी किंवा जिल्हामध्यवर्ती बँक तसेच किंवा राज्य

शासनाने, नियमाद्वारे किंवा त्याबाबतीत दिलेल्या आदेशाद्वारे परवानगी दिलेल्या कोणत्याही एकामध्ये गुंतवणूक येईल. अतिरिक्त निधीची गुंतवणूक करताना राज्य, जिल्हा सहकारी बँक वगळता अन्य प्रत्यक्षात कोणत्याही एका ठिकाणी ती करावयाची असल्यास ती पतसंस्थेच्या लगतचे वर्षा अखेरील एकूण ठेवींच्या ५ टक्क्यांपेक्षा जादा असणार नाही.

ब) वरील निर्धारित केलेल्या गुंतवणुकी व्यतिरिक्त सदर पतसंस्थेला अन्य कोणत्याही प्रकारच्या संस्थेमध्ये (जिल्हा व राज्य सहकारी बँकेचे भाग खरेदी किंवा संस्थेच्या व्यवसायासाठी लागणाऱ्या आगोऊदीत संबंधित गृहनिर्माण संस्थेमध्ये करावयाच्या भाग रकमेची गुंतवणूक वगळता) गुंतवणूक अथवा खाते उघडता येणार नाही.

क) कोणतीही पतसंस्था अन्य कोणत्याही पतसंस्थेत कसल्याही प्रकारचे खाते उघडणार नाही वा गुंतवणूक करणार नाही.

ड) वैधानिक गुंतवणूक ही कार्यक्षेत्रामधीलच प्राधिकृत बँकांमध्ये केली जाईल. मात्र अतिरिक्त निधी गुंतवणूक कार्यक्षेत्रामध्ये प्राधिकृत बँक उपलब्ध नसल्यास नजिकचे एका कोणत्याही जिल्ह्यामधील प्राधिकृत बँकेत करता येईल. मात्र अशा गुंतवणूकीबाबत संस्थेला पर्याय उपलब्ध नसल्याबाबतचा लेखापरीक्षकांचा अभिप्राय त्यांचे लेखापरीक्षण अहवालात नमुद असणे आवश्यक आहे.
अशी गुंतवणूक नजिकचे जिल्ह्यात करताना ती महाराष्ट्र राज्यामधीलच जिल्ह्यात करणेस मुभा आहे. अन्य राज्यांचे कार्यक्षेत्रामध्ये अशी गुंतवणूक करता येणार नाही. प्रत्येक संस्थेला स्वतःच्या व्यावसायिक गरजा घेवून उपविधीतील तरतूदीस अधिन राहून गुंतवणूक धोरण निश्चित करता येईल. मात्र अशा या धोरणाला वार्षिक साधारण सभेची मान्यता असणे अनिवार्य असेल.

५३. कर्ज व्यवहार–

सदर उपविधी स्विकृती झाल्यापासून नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थासाठी कर्ज विषयक व कर्ज प्रकार निहाय कमाल कर्ज मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

परिशिष्ट "क-१"

**नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे कर्जविषयक प्रकार आणि कर्जाची कमाल मर्यादा**

नोंदणी झाल्यापासून नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी कर्ज विषयक प्रकार निहाय कमाल कर्ज मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

टीप : नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पत संस्थेच्या संचालक मंडळ, त्याच्याशी संबंधित संस्था (कन्सर्नस), त्यांचे नातेवाईक किंवा त्यांच्या संबंधित संस्था यांना दिलेली एकूण केवळ तारणी कर्जे पतसंस्थेच्या एकूण कर्ज रकमेच्या ५% पेक्षा जास्त होता कामा नये.

**महत्तम कर्ज मर्यादा म्हणजे कॅश क्रेडिट कर्ज मंजूर असल्यास त्याची मंजूर मर्यादा व उर्वरित कर्जाबाबतची ( सोने तारण/एनएससी/एलआयसी तारण ही कर्जे वगळून) येणे बाकी अशी एकत्रित कर्ज रक्कम होय.**

परिशिष्ट "क १"

निकष १) नव्याने नोंदणी झालेल्या तसेच खेळते भांडवल रू. १ कोटीपेक्षा कमी असलेल्या संस्था

२) रु. १ कोटीपेक्षा जास्त खेळते भांडवल असलेल्या आणि मागील आर्थिक वर्षामध्ये लेखापरिक्षण वर्ग 'क' किंवा 'ड' असणाऱ्या संस्था



Rajarshi Shahu Arts & Comm. College, Rukadi

R. No. KPR/HLE/RSR/CR/1967/2000 Dt. 11.8.2000
Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

| क्र. | कर्जाचा प्रकार | कमाल कर्ज मर्यादा |
|---|---|---|
| १. | सामान्य कर्ज | रु. ५०,००० पर्यंत |
| २. | तारणी कर्ज | |
| | अ) नवीन वाहन तारण/ इतर तारण कर्ज | वाहन तारण किंमतीच्या ७५% किंवा रू. १.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| | ब) ५ वर्षाच्या आतील जुने वाहन तारण | पाच वर्षाच्या आतील जुने वाहन तारण मूल्यांकन किंमतीच्या ५०% किंवा किंवा रू. १ लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | क) स्थावर/ गृह बांधणी/ फ्लॅट तारण कर्ज | स्थावर तारण, कर्ज रक्कमेच्या दुप्पट किंमतीच्या असले पाहिजे. आणि जास्तीत जास्त कर्ज रू. १.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ड) व्यावसायिक कर्ज | स्थावर तारण किंमतीच्या ७०% किंवा रू.१.५० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | इ) मशिनरी तारण कर्ज | स्थावर तारण, कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे असले पाहिजे आणि जास्तीत जास्त कर्ज रू. १.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ई) माल तारण मुदत कर्ज | माल तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीच्या एवढा तीन महिन्याच्या आतील स्टॉक तारण असावा आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. १.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्जरक्कम |
| | उ) ठेव तारण कर्ज | स्वतःच्या अथवा त्रयस्थ नावे असणाऱ्या मुदत ठेवी तारण घेवून मुदत ठेवीच्या ८५% पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| | ऊ) सोने/चांदी/दागदागिने तारण कर्ज | सोने, चांदी, दागदागिने बाजार किंमतीच्या ८५ % पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ए) व्यावसायिक शिक्षण / उच्च शिक्षण कर्ज | मध्यम मुदतीचे, स्थावर तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. १.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ३. | कॅश क्रेडीट कर्ज | स्वनिधीच्या १०% किंवा रु. १.५० लाखापर्यंत यातील किमान असेल ती रक्कम मात्र कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे स्थावर तारण घेणे बंधनकारक राहील. सदर कर्ज १ वर्ष मुदतीचे राहील. |

टीप – परिशिष्ठ 'क' १ मधील पतसंस्थामधील एका व्यक्तीस द्यावयाची महत्तम कर्ज मर्यादा कोणत्याही दिवशी संस्थेच्या लगतचे आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाने प्रमाणित केलेल्या स्वनिधीच्या २०% किंवा रू. २.५० लाख यापेक्षा जास्त असणार नाही तसेच एका व्यक्तीच्या नातेवाईकांना / त्यांच्या कंपनी / फर्मस् यांना एकत्रित महत्तम कर्ज मर्यादा स्वनिधीच्या २०% किंवा रु. ४ लाखापेक्षा जास्त असणार नाही.

## परिशिष्ट 'क-२'

परिशिष्ट 'क-२' मधील कर्ज विषयक प्रकार आणि कर्जाची कमाल मर्यादा अंमलात आणण्यासाठी नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था खालील सर्व निकष पूर्ण करीत असली पाहिजे.

**निकष -** १) रु. १ कोटी पेक्षा जास्त आणि रु. २५ कोटी पेक्षा कमी खेळते भांडवल

२) स्वनिधी किमान रु. १० लाख असणे आवश्यक आहे.

३) मागील लगतच्या आर्थिक वर्षाचा लेखा परीक्षण वर्ग 'अ' किंवा 'ब' असावा.

टीप : नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ, त्यांच्या संबंधित संस्था (कन्सर्नस), त्यांचे नातेवाईक किंवा त्यांच्या संबंधित संस्था यांना दिलेली एकूण कर्जे (तारणी) पतसंस्थेच्या एकूण कर्ज रकमेच्या ५% पेक्षा जास्त होता कामा नये.

महत्तम कर्ज मर्यादा म्हणजे कॅश क्रेडिट कर्ज मंजूर असल्यास त्याची मंजूर मर्यादा व उर्वरित कर्जाबाबतची (सोने तारण/एनएससी/एलआयसी तारण ही कर्जे वगळून) येणे बाकी अशी एकत्रित कर्ज रक्कम होय.

| क्र. | कर्जाचा प्रकार | कमाल कर्ज मर्यादा |
|---|---|---|
| १. | सामान्य कर्ज | रु. ७५,००० पर्यंत |
| २. | तारणी कर्ज | |
| | अ) नवीन वाहन तारण कर्ज | वाहन तारण किंमतीच्या ७५% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ब) ५ वर्षाच्या आतील जुने वाहन तारण कर्ज | पाच वर्षाच्या आतील जुने वाहन तारण मूल्यांकन किंमतीच्या ५०% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. ७.५० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | क) स्थावर तारण कर्ज (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी कर्ज) | स्थावर तारण (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी) कर्ज स्थावर मुल्यांकनाच्या ७५% पर्यंत आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ड) व्यावसायिक कर्ज | स्थावर तारण मूल्यांकन किंमतीच्या ७०% एवढे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | इ) मशिनरी तारण कर्ज | स्थावर तारण कर्ज मशिनरी तारण मूल्यांकनाच्या ५०% किंमतीचे असले पाहिजे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ई) माल तारण मुदत कर्ज | माल तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीच्या एवढा तीन महिन्याच्या आतील स्टॉक तारण असावा आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रु. ७.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | उ) ठेव तारण कर्ज | स्वत:च्या अथवा त्रयस्थ नावे असणाऱ्या मुदत ठेवी तारण घेवून मुदत ठेवीच्या ८५% पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

ऊ) सोने/चांदी/दागदागिने कर्ज — सोने, चांदी, दागदागिने बाजार किंमतीच्या ८५ % पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु.१०लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.

ए) व्यावसायिक शिक्षण / उच्च शिक्षण कर्ज — मध्यम मुदतीचे, स्थावर तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रु. ७.५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.

३. कॅश क्रेडीट कर्ज — स्वनिधीच्या १०% किंवा रु. १० लाखापर्यंत यातील किमान असेल ती रक्कम; मात्र कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे स्थावर तारण घेणे बंधनकारक राहील. सदर कर्ज १ वर्ष मुदतीचे राहील.

टीप – परिशिष्ट 'क' २ मधील पतसंस्थामधील एका व्यक्तीस द्यावयाची महत्तम कर्ज मर्यादा कोणत्याही दिवशी संस्थेच्या लगतचे आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाने प्रमाणित केलेल्या स्वनिधीच्या २०% किंवा रू. २० लाख यापेक्षा जास्त असणार नाही तसेच एका व्यक्तीच्या नातेवाईकांना / त्यांच्या कंपनी / फर्मस् यांना एकत्रित महत्तम कर्ज मर्यादा स्वनिधीच्या २०% किंवा रु. २५ लाखापेक्षा जास्त असणार नाही.

## परिशिष्ट 'क–३'

परिशिष्ट 'क–३' मधील कर्ज विषयक प्रकार आणि कर्जाची कमाल मर्यादा अंमलात आणण्यासाठी नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था खालील सर्व निकष पूर्ण करीत असली पाहिजे.

**निकष** – १) रु.२५ कोटी आणि त्यापेक्षा जास्त आणि रु. ५० कोटी पेक्षा कमी खेळते भांडवल

२) स्वनिधी किमान रु. २.५० कोटी असणे आवश्यक आहे.

३) मागील लगतच्या आर्थिक वर्षाचा लेखा परीक्षण वर्ग 'अ' किंवा 'ब' असावा.

टीप : नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ, त्यांच्या संबंधित संस्था (कन्सर्नस्), त्यांचे नातेवाईक किंवा त्यांच्या संबंधित संस्था यांना दिलेली एकूण कर्जे (तारणी) पतसंस्थेच्या एकूण कर्ज रकमेच्या ५% पेक्षा जास्त होता कामा नये.

**महत्तम कर्ज मर्यादा म्हणजे कॅश क्रेडिट कर्ज मंजूर असल्यास त्याची मंजूर मर्यादा व उर्वरित कर्जाबाबतची ( सोने तारण/एनएससी/एलआयसी तारण ही कर्जे वगळून) येणे बाकी अशी एकत्रित कर्ज रक्कम होय.**

| क्र. | कर्जाचा प्रकार | कमाल कर्ज मर्यादा |
|---|---|---|
| १. | सामान्य कर्ज | रु. १,००,००० पर्यंत |
| २. | तारणी कर्ज | |
| | अ) नवीन वाहन तारण कर्ज | वाहन तारण किंमतीच्या ७५% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. २० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ब) ५ वर्षाच्या आतील जुने वाहन तारण कर्ज | पाच वर्षाच्या आतील जुने वाहन तारण मुल्यांकन किंमतीच्या ५०% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. १० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |

Rukadi



| | | |
|---|---|---|
| | क) स्थावर तारण कर्ज (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी कर्ज) | स्थावर तारण (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी) कर्ज स्थावर मुल्यांकनाच्या ७५% पर्यंत आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. २५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ड) व्यावसायिक कर्ज | स्थावर तारण मूल्यांकन किंमतीच्या ७०% एवढे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. २५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | इ) मशिनरी तारण कर्ज | स्थावर तारण कर्ज मशिनरी तारण मूल्यांकनाच्या ५०% किंमतीचे असले पाहिजे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. २५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ई) माल तारण मुदत कर्ज | माल तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीच्या एवढा तीन महिन्याच्या आतील स्टॉक तारण असावा आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. २० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | उ) ठेव तारण कर्ज | स्वत:च्या अथवा त्रयस्थ नावे असणाऱ्या मुदत ठेवी तारण घेवून मुदत ठेवीच्या ८५% पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. २५ लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ऊ) सोने/चांदी/दागदागिने तारण कर्ज | सोने, चांदी, दागदागिने बाजार किंमतीच्या ८५% पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु.२५ लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ए) व्यावसायिक शिक्षण / उच्च शिक्षण कर्ज | मध्यम मुदतीचे, स्थावर तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किमतीचे आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. २० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ३. | कॅश क्रेडीट कर्ज | स्वनिधीच्या १०% किंवा रु. २० लाखापर्यंत यातील किमान असेल ती रक्कम; मात्र कर्ज रकमेच्या दुप्पट किमतीचे स्थावर तारण घेणे बंधनकारक राहील. सदर कर्ज १ वर्ष मुदतीचे राहील.<br>टीप – परिशिष्ठ 'क' ३ मधील पतसंस्थामधील एका व्यक्तीस द्यावयाची महत्तम कर्ज मर्यादा कोणत्याही दिवशी संस्थेच्या लगतचे आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाने प्रमाणित केलेल्या स्वनिधीच्या २०% किंवा रू. ३० लाख यापेक्षा जास्त असणार नाही तसेच एका व्यक्तीच्या नातेवाईकांना / त्यांच्या कंपनी / फर्मस् यांना एकत्रित महत्तम कर्ज मर्यादा स्वनिधीच्या २०% किंवा रु. ३५ लाखापेक्षा जास्त असणार नाही. |

## परिशिष्ठ 'क–४'

परिशिष्ठ 'क–३' मधील कर्ज विषयक प्रकार आणि कर्जाची कमाल मर्यादा अंमलात आणण्यासाठी नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था खालील सर्व निकष पूर्ण करीत असला पाहिजे.

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi



* ज्या पतसंस्थेचे खेळते भांडवल रु. ५० ते १०० कोटी असेल.

* किमान स्वनिधी रुपये ५ कोटी असणे आवश्यक आहे.

टीप : नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ, त्यांच्या संबंधित संस्था (कन्सर्नस), त्यांचे नातेवाईक किंवा त्यांच्या संबंधित संस्था यांना दिलेली एकूण कर्जे (तारणी) पतसंस्थेच्या एकूण कर्ज रकमेच्या ५% पेक्षा जास्त होता कामा नये.

महत्तम कर्ज मर्यादा म्हणजे कॅश क्रेडिट कर्ज मंजूर असल्यास त्याची मंजूर मर्यादा व उर्वरित कर्जाबाबतची ( सोने तारण/एनएससी/एलआयसी तारण ही कर्जे वगळून) येणे बाकी अशी एकत्रित कर्ज रक्कम होय.

| क्र. | कर्जाचा प्रकार | कमाल कर्ज मर्यादा |
|---|---|---|
| १. | सामान्य कर्ज | रु. १,००,००० पर्यंत |
| २. | तारणी कर्ज | |
| | अ) नवीन वाहन तारण कर्ज | वाहन तारण किंमतीच्या ७५% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ३० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ब) ५ वर्षाच्या आतील जुने वाहन तारण कर्ज | पाच वर्षाच्या आतील जुने वाहन तारण मूल्यांकन किंमतीच्या ५०% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. १५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | क ) स्थावर तारण कर्ज (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी कर्ज) | स्थावर तारण (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी) कर्ज स्थावर मुल्यांकनाच्या ७५% पर्यंत आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ३५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ड) व्यावसायिक कर्ज | स्थावर तारण मूल्यांकन किंमतीच्या ७०% एवढे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ३५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | इ) मशिनरी तारण कर्ज | स्थावर तारण कर्ज मशिनरी तारण मूल्यांकनाच्या ५०% किंमतीचे असले पाहिजे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रुपये ३५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ई) माल तारण मुदत कर्ज | माल तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीच्या एवढा तीन महिन्याच्या आतील स्टॉक तारण असावा आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. २५ लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | उ) ठेव तारण कर्ज | स्वतःच्या अथवा त्रयस्थ नावे असणाऱ्या मुदत ठेवी तारण घेवून मुदत ठेवीच्या ८५% किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. ३५ लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ऊ) सोने/चांदी/दागदागिने तारण कर्ज | सोने, चांदी, दागदागिने बाजार किंमतीच्या ८५% पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. ३५ लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi



| | |
|---|---|
| ए) व्यावसायिक शिक्षण / उच्च शिक्षण कर्ज | मध्यम मुदतीचे, स्थावर तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. २५ लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ३. कॅश क्रेडीट कर्जे | स्वनिधीच्या १०% किंवा रु. २५ लाखापर्यंत यातील किमान असेल ती रक्कम मात्र कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे स्थावर तारण घेणे बंधनकारक राहील. सदर कर्ज १ वर्ष मुदतीचे राहील. |

टीप – परिशिष्ठ 'क' ४ मधील पतसंस्थामधील एका व्यक्तीस द्यावयाची महत्तम कर्ज मर्यादा कोणत्याही दिवशी संस्थेच्या लगतचे आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाने प्रमाणित केलेल्या स्वनिधीच्या २०% किंवा रू. ४० लाख यापेक्षा जास्त असणार नाही तसेच एका व्यक्तीच्या नातेवाईकांना / त्यांच्या कंपनी / फर्मस् यांना एकत्रित महत्तम कर्ज मर्यादा स्वनिधीच्या २०% किंवा रु. ५० लाखापेक्षा जास्त असणार नाही.

## परिशिष्ठ 'क-५'

परिशिष्ठ 'क-५' मधील कर्ज विषयक प्रकार आणि कर्जाची कमाल मर्यादा अंमलात आणण्यासाठी नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था खालील सर्व निकष पूर्ण करीत असली पाहिजे.

* ज्या पतसंस्थेचे खेळते भांडवल रु. १०० कोटी ते रु. ३०० कोटी असेल.

* स्वनिधी रूपये १० कोटी असेल.

टीप : नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ, त्यांच्या संबंधित संस्था (कन्सर्नस्), त्यांचे नातेवाईक किंवा त्यांच्या संबंधित संस्था यांना दिलेली एकूण कर्जे (तारणी) पतसंस्थेच्या एकूण कर्ज रकमेच्या ५% पेक्षा जास्त होता कामा नये.

महत्तम कर्ज मर्यादा म्हणजे कॅश क्रेडिट कर्ज मंजूर असल्यास त्याची मंजूर मर्यादा व उर्वरित कर्जाबाबतची ( सोने तारण/एनएससी/एलआयसी तारण ही कर्जे वगळून) येणे बाकी अशी एकत्रित कर्ज रक्कम होय.

| क्र. | कर्जाचा प्रकार | कमाल कर्ज मर्यादा |
|---|---|---|
| १. | सामान्य कर्ज | रु. १,५०,००० पर्यंत |
| २. | तारणी कर्ज | |
| | अ) नवीन वाहन तारण कर्ज | वाहन तारण किंमतीच्या ७५% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ४० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ब) ५ वर्षाच्या आतील जुने वाहन तारण कर्ज | पाच वर्षाच्या आतील जुने वाहन तारण मूल्यांकन किंमतीच्या ५०% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. २५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | क ) स्थावर तारण कर्ज (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी कर्ज) | स्थावर तारण (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी) कर्ज स्थावर मुल्यांकनाच्या ७५% पर्यंत आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ५० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| | ड) व्यावसायिक कर्ज | स्थावर तारण मूल्यांकन किंमतीच्या ७०% एवढे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ५० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |

Shahu Arts & Comm. College Rukadi

| | |
|---|---|
| इ) मशिनरी तारण कर्ज | स्थावर तारण कर्ज मशिनरी तारण मूल्यांकनाच्या ५०% किंमतीचे असले पाहिजे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रुपये ४० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ई) माल तारण मुदत कर्ज | माल तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीच्या एवढा तीन महिन्याच्या आतील स्टॉक तारण असावा आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. ४० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| उ) ठेव तारण कर्ज | स्वतःच्या अथवा त्रयस्थ नावे असणाऱ्या मुदत ठेवी तारण घेवून मुदत ठेवीच्या ८५% किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. ५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ऊ) सोने/चांदी/दागदागिने तारण कर्ज | सोने, चांदी, दागदागिने बाजार किंमतीच्या ८५ % पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. ५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ए) व्यावसायिक शिक्षण / उच्च शिक्षण कर्ज | मध्यम मुदतीचे, स्थावर तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. ४० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ३. कॅश क्रेडीट कर्ज | स्वनिधीच्या १०% किंवा रु. ५० लाखापर्यंत यातील किमान असेल ती रक्कम मात्र कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे स्थावर तारण घेणे बंधनकारक राहील. सदर कर्ज १ वर्ष मुदतीचे राहील. |

टीप – परिशिष्ट 'क' ५ मधील पतसंस्थामधील एका व्यक्तीस द्यावयाची महत्तम कर्ज मर्यादा कोणत्याही दिवशी संस्थेच्या लगतचे आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाने प्रमाणित केलेल्या स्वनिधीच्या २०% किंवा रू. ६० लाख यापेक्षा जास्त असणार नाही तसेच एका व्यक्तीच्या नातेवाईकांना / त्यांच्या कंपनी / फर्मस् यांना एकत्रित महत्तम कर्ज मर्यादा स्वनिधीच्या २०% किंवा रु. ७५ लाखापेक्षा जास्त असणार नाही.

## परिशिष्ट 'क-६'

परिशिष्ट 'क-६' मधील कर्ज विषयक प्रकार आणि कर्जाची कमाल मर्यादा अंमलात आणण्यासाठी नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था खालील सर्व निकष पूर्ण करीत असली पाहिजे.

* ज्या पतसंस्थेचे खेळते भांडवल रु. ३०० कोटीपेक्षा जास्त असेल.
* किमान स्वनिधी रु. २५ कोटीपेक्षा जास्त असावा.

टीप : नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे संचालक मंडळ, त्यांच्या संबंधित संस्था (कन्सर्नस), त्यांचे नातेवाईक किंवा त्यांच्या संबंधित संस्था यांना दिलेली एकूण कर्जे (तारणी) पतसंस्थेच्या एकूण कर्ज रकमेच्या ५% पेक्षा जास्त होता कामा नये.

महत्तम कर्ज मर्यादा म्हणजे कॅश क्रेडिट कर्ज मंजूर असल्यास त्याची मंजूर मर्यादा व उर्वरित कर्जाबाबतची ( सोने तारण/एनएससी/एलआयसी तारण ही कर्जे वगळून) येणे बाकी अशी एकत्रित कर्ज रक्कम होय.

| क्र. | कर्जाचा प्रकार | कमाल कर्ज मर्यादा |
|---|---|---|
| १. | सामान्य कर्ज | रु. १,५०,००० पर्यंत |

Rajarshi Shahu Arts & Comm. College, Rukadi



२.. तारणी कर्ज

| | |
|---|---|
| अ) नवीन वाहन तारण कर्ज | वाहन तारण किंमतीच्या ७५% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ४० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ब) ५ वर्षाच्या आतील जुने वाहन तारण कर्ज | पाच वर्षाच्या आतील जुने वाहन तारण मूल्यांकन किंमतीच्या ५०% आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. २५ लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| क ) स्थावर तारण कर्ज (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी कर्ज) | स्थावर तारण (गृह बांधणी / फ्लॅट खरेदी) कर्ज स्थावर मुल्यांकनाच्या ७५% पर्यंत आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ६० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ड) व्यावसायिक कर्ज | स्थावर तारण मूल्यांकन किंमतीच्या ७०% एवढे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रू. ६० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| इ) मशिनरी तारण कर्ज | स्थावर तारण कर्ज मशिनरी तारण मूल्यांकनाच्या ५०% किंमतीचे असले पाहिजे आणि स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त नाही एवढी व जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रुपये ६० लाखापर्यंत जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ई) माल तारण मुदत कर्ज | माल तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीच्या एवढा तीन महिन्याच्या आतील स्टॉक तारण असावा आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. ४० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| उ) ठेव तारण कर्ज | स्वतःच्या अथवा त्रयस्थ नावे असणाऱ्या मुदत ठेवी तारण घेवून मुदत ठेवीच्या ८५% किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. ६० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ऊ) सोने/चांदी/दागदागिने तारण कर्ज | सोने, चांदी, दागदागिने बाजार किंमतीच्या ८५ % पर्यंत किंवा जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. ६० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ए) व्यावसायिक शिक्षण / उच्च शिक्षण कर्ज | मध्यम मुदतीचे, स्थावर तारण कर्ज रकमेच्या दुप्पट किमतीचे आणि जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये व जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रू. ५० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम. |
| ३. कॅश क्रेडीट कर्ज | स्वनिधीच्या १०% किंवा रु. ५० लाखापर्यंत यातील किमान असेल ती रक्कम मात्र कर्ज रकमेच्या दुप्पट किमतीचे स्थावर तारण घेणे बंधनकारक राहील. सदर कर्ज १ वर्ष मुदतीचे राहील. |

टीप – परिशिष्ट 'क' ५ मधील पतसंस्थामधील एका व्यक्तीस द्यावयाची महत्तम कर्ज मर्यादा कोणत्याही दिवशी संस्थेच्या लगतचे आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाने प्रमाणित केलेल्या स्वनिधीच्या २०% किंवा रू. ७५ लाख यापेक्षा जास्त असणार नाही तसेच एका व्यक्तीच्या नातेवाईकांना / त्यांच्या कंपनी / फर्मस् यांना एकत्रित महत्तम कर्ज मर्यादा स्वनिधीच्या २०% किंवा रु. १०० लाखापेक्षा जास्त असणार नाही.

Rukadi



**कर्ज प्रकारानुसार कमाल कर्ज मर्यादा –**

१) **विनातारणी / जामीनकी** – कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण विनातारणी / जामीनकी कर्जे ही संस्थेच्या एकूण कर्जांच्या १५% पेक्षा जादा असणार नाहीत.

२) **गृह बांधणी कर्ज** – कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण गृह बांधणी कर्जे ही संस्थेच्या एकूण कर्जांच्या १५% पेक्षा जादा असणार नाहीत.

३) **व्यावसायिक कर्जे** – कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण व्यावसायिक कर्जे ही संस्थेच्या एकूण कर्जांच्या २०% पेक्षा जादा असणार नाहीत.

४) **मालतारण मुदत कर्जे** – कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण मालतारण मुदत कर्जे ही संस्थेच्या एकूण कर्जांच्या १०% पेक्षा जादा असणार नाहीत.

५) **वाहन तारण कर्जे** – कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण नविन व जुन्या वाहन तारणावरील एकत्रित रक्कम ही संस्थेच्या एकूण कर्जांच्या १५ % पेक्षा जादा असणार नाहीत.

६) **कॅश क्रेडीट कर्जे** – कोणत्याही दिवशी संस्थेची एकूण कॅश क्रेडीट कर्जे ही संस्थेच्या एकूण कर्जांच्या १५% पेक्षा जास्त असणार नाही.

७) **सोने तारण, मुदत ठेव तारण, एन.एस.सी. तारण इ. कर्जांना वरील प्रमाणे कर्ज प्रकारानुसारची एकत्रित कमाल महत्तम मर्यादा लागू असणार नाही.**

प्रत्येक संस्था वरील मर्यादांचे आधारे १ ऑक्टोबर ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी प्रतिवर्षांचे कर्ज धोरण संस्थेच्या व्यवसाय गरजेनुसार निश्चित करेल व अशा कर्ज धोरणाला संचालक मंडळाचे शिफारसीनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेत नोंद घेण्यात येईल. संस्था प्रतिवर्षी वैधानिक लेखापरिक्षकांकडून स्वनिधी प्रमाणित करून घेईल व अशा प्रमाणित करून घेतलेल्या स्वनिधीच्या आधारावरच वरील विहित मर्यादानुसार कर्ज देता येईल.

महत्वाचे – आर्थिक वर्षात संस्थेचे केव्हाही वर्गीकरण बदलले तरी नवीन बदलेल्या वर्गीकरणानुसार कर्ज वाटप मर्यादा या वर्गीकरण बदलेल्या लगतचे आर्थिक वर्षाचे सुरुवातीपासून नवीन वा नुतनीकरण होणाऱ्या कर्जांसाठी लागू होतील. जी संस्था आर्थिक वर्षाचे सुरुवातीसच वरीलप्रमाणे पात्रतेसाठी असणारे सर्व निकष पूर्ण करीत नसेल अशा संस्थेने त्यांचेपेक्षा लहान असणाऱ्या संस्थांना लागू असणाऱ्या निकषांप्रमाणे कर्जवाटप करायचे आहे.

उदा. एखाद्या संस्थेचे खेळते भांडवल २० कोटी आहे परंतु उर्वरीत ३ निकषांपैकी कोणताही एखादा निकष जरी ती पूर्ण करत नसेल तर अशा संस्थेसाठी कर्जवाटप मर्यादा परिशिष्ठ क्र. क–१ प्रमाणे राहील. सदर संस्थेने आर्थिक वर्षात केव्हाही आधेमधे निकष पूर्ण केले तरी सदर संस्थेला परिशिष्ठ क्र. क–२ नुसार कर्जवाटप मर्यादा निकषपूर्ततेनंतरचे लगतचे आर्थिक वर्षापासून लागू होतील. तसेच एखादी संस्था परिशिष्ठ क्र. क–२ चे सर्व निकष आर्थिक वर्षाचे सुरुवातीस पूर्ण करीत असेल मात्र आर्थिक वर्षाचे आधेमधे तिची निकष पूर्तता होत नसेल अशावेळी कर्जवाटप मर्यादा पात्र परिशिष्ठानुसार त्या आर्थिक वर्षासाठी राहील.

**कर्ज विषयक नियम**

**नियम क्र. १** या नियमाला पतसंस्थेचे कर्ज विषयक नियम असे संबोधण्यात येईल व हे नियम नोंदणी अधिकाऱ्यांनी नोंदणी दिल्यानंतर अंमलात येतील.

**नियम क्र. २** अर्जदार सभासदाने इतर कोणत्याही नागरी संस्था / नागरी पतसंस्था अथवा पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्थेकडून कर्ज घेतलेले नसावे. तसे घेतले असल्यास कलम ४५ नुसार पूर्तता करावी.

Rajarshi Shahu Arts & Comm. College, Rukadi



**नियम क्र. ३** संस्थेकडून कर्ज मिळविण्यासाठी संस्थेने विहित केलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करावा लागेल सदर अर्जात खालील बाबींचा समावेश असेल.

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव, व्यवसाय, पत्रव्यवहाराचा पत्ता, राहण्याचे ठिकाण (आवश्यक तेथे गावाचा संपूर्ण पत्ता)

२) कर्जाची रक्कम

३) कर्जाचा उद्देश

४) कर्ज फेडीचा कालावधी व प्रकार

५) कर्जदाराचे दरमहा उत्पन्न (ज्यावेळी आवश्यक असेल त्यावेळी कुटुंबियांचे दरमहा उत्पन्न)

६) जामीनदाराचे संपूर्ण नाव, व्यवसाय, पत्रव्यवहाराचा पत्ता, राहण्याचे ठिकाण (आवश्यक तेथे गावाचा पत्ता), जामिनदाराचे मासिक उत्पन्न व त्याचबरोबर जामीनदाराचे जामीनाबाबतचे संमतीपत्रक.

७) इतर तारणाचा प्रकार व वर्णन

८) जर अर्जदार अथवा जामीनदार इतर बँकांचा अथवा पतसंस्थांचा सभासद असेल त्याचे दायित्व.

**नियम क्र. ४** संचालक मंडळास अधिक माहिती हवी असल्यास ती माहिती द्यावी. संस्थेकडे कर्ज मिळविण्यासाठी आलेले अर्ज त्यासाठीच्या अर्ज नोंदवहीत नोंदवण्यात येतील व त्यात अर्जाचा दिनांक, अर्जदाराचे नाव कर्जाचा प्रकार, मागणी केलेल्या कर्जाची रक्कम नोंदविण्यात येईल.

**नियम क्र. ५** अशा अर्जाची संस्थेच्या सेवकांमार्फत (व्यवस्थापक इत्यादि) योग्य रित्या अतिरिक्त माहिती मागवू शकेल अथवा आवश्यक ती चौकशी करू शकेल.

**नियम क्र. ६** संचालक मंडळ अर्जदाराकडून अथवा जामीनदाराकडून आवश्यक असणारी अतिरिक्त माहिती मागवू शकेल अथवा आवश्यक ती चौकशी करू शकेल.

**नियम क्र. ७** संचालक मंडळाने कर्ज नामंजूर केल्यास कर्ज नामंजूर झाल्याच्या तारखेपासून तसे एका महिन्याच्या आत अर्जदारास कळविण्यात येईल. नामंजूर कर्जाबाबत कर्ज नामंजूर दिनांकापासून ३ महिन्यापर्यंत सदर कर्जाबाबत पुर्नविचार केला जाणार नाही.

**नियम क्र. ८** **कर्ज प्रकार**

संस्थेकडून (१) विना तारणी / जामिनकी आणि (२) तारणी अशी कर्जे दिली जातील. विनातारणी / जामिनकी कर्जाव्यतिरिक्त जी तारणे कर्जे दिली जातील ती खालील प्रकारची असतील.

अ) वाहन तारण कर्ज

ब) व्यावसायिक (जमीन, मोकळा प्लॉट, फ्लॅट, इमारत, घर वगैरे)

क) गृह बांधणी कर्ज

ड) एन.एस.सी./एल.आय.सी./सहकारी ऋण पत्रे तारण कर्ज

इ) सोने तारण कर्ज

ई) चांदी दागिने तारणकर्ज

फ) ठेव तारण कर्ज

ग) विनातारणी / जामीनकी कर्ज

घ) कॅश क्रेडीट

**नियम क्र. ९** **कर्ज मर्यादा**

परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेल्या कर्जाच्या मर्यादेस अधिन राहून सहकार खात्याने मंजूर करून दिलेल्या कर्ज नियमावलीतील बाबींची (कागद पत्रांची) पूर्तता करून घेवून संस्था आपल्या सभासदांना कर्जे मंजूर करील.

Rukadi



**नियम क्र. १० कर्जाची मुदत**

संस्थेच्या कर्ज फेडीसाठी अल्प मुदत १५ महिने पर्यंत, मध्यम मुदत १६ महिने ते ६० महिने, दिर्घ मुदत – ६१ महिने ते १८० महिने अशी राहील. (कर्जनिहाय महत्तम मुदती संबंधित कर्जप्रकारामध्ये निश्चित केलेल्या आहेत.)

**नियम क्र. ११** कर्ज व्याजदर

अ) कर्जावरील व्याजदर संचालक मंडळ सभेमध्ये ए.बी.आर. आणि ए.एल.आर. यांचा आढावा घेऊन ठरवले जातील. तेच व्याजदर अंमलात राहतील.

ब) व्याज आकारणी ही चक्रवाढ व्याज पद्धतीने कटमितीने दिवसावर केली जाईल. हप्तेबंदी स्वरूपाचे कर्जास व्याज आकारणी दरमहा केली जाईल. आकारणी केलेली व्याजाची रक्कम मुद्दलात जमा केली जाईल.

क) कर्जाची मुदत संपले तारखेपासून किंवा अनुत्पादक झालेपासून थकबाकी समजणेत येईल. अशा थकलेल्या रकमेवर द.सा.द.शे. २% प्रमाणे जादा दंड व्याजाची आकारणी केली जाईल.

ड) अनुत्पादित (एन.पी.ए.)कर्जाबाबत सहकार खात्याने वेळोवेळी जारी केलेल्या परिपत्रकीय सूचनाप्रमाणे व्याज आकारणी केली जाईल.

इ) कर्ज मुद्दल, कर्ज व्याज सतत थकित राहिल्यास एन.पी.ए. मानांकना प्रमाणे सदर कर्जाची अनुत्पादक मालमत्तेत गणना करून येणे व्याज स्वतंत्र नमूद केले जाईल.

**कर्जदार व जामीनदार पात्रता :**

१) सभासद कर्जदाराने दोन लायक सभासद कर्जासाठी जामीनदार म्हणून दिले पाहिजेत व असे जामीनदार हे त्या कर्जदाराच्या कुटुंबातील अगर एकाच कुटुंबातील असता कामा नयेत. तसेच क्रॉस जामीनकी चालणार नाही.

२) कर्ज मागणी करणारा सभासद अगर जामीनदार हे कोणत्याही अन्य कर्जास, कर्जदार, जामीनदार अगर मान्यतादार या नात्याने थकबाकीदार असता कामा नये.

३) एका सभासदास जास्तीत जास्त दोन सभासदांना कर्जासाठी जामीन होता येईल.

४) अ) नोंदणीकृत भागीदार संस्थेला कर्ज देता येईल.

ब) भागीदारी फर्मला (संस्थेला) कर्जदेताना तिचा प्रत्येक भागीदार हा संस्थेचा सभासद असला पाहिजे.

क) भागीदारी फर्मचे सर्व भागीदार हे सहजकर्जदार व कर्जाला मान्यतादार असले पाहिजेत व फर्मने मागणी केलेल्या कर्जास त्यांना जामीनदार होता येणार नाही.

५) जामीनदार मान्य करणे, नाकारणे बदलून घेणे, जादा मागणे याचा संपूर्ण अधिकार संचालक मंडळाला राहील.

६) संचालक व त्यांचे नातेवाईक यांची कर्जे

अ) संचालक व त्यांच्या नातेवाईकांना संस्थेच्या एकूण येणे कर्जाच्या ५% पेक्षा जास्त कर्ज देता येणार नाही. (संचालकांचे नातेवाईक म्हणजे पत्नी/पती/वडील/आई/भाऊ / बहिण/ मुलगा/मुलगी/ जावई किंवा सून)

ब) संस्थेच्या कोणत्याही संचालक व त्याच्या नातेवाईकांना विनातारणी कर्ज देता येणार नाही. अगर विनातारणी कर्जाला जामीन राहता येणार नाही.

७) प्रत्येक कर्जदार / जामीनार ह्यांची के.वाय.सी. पूर्तता होणे आवश्यक राहील.

Shahu Arts & Comm. College, Rukadi



**कर्ज मागणी अर्ज व त्या सोबतचे कागदपत्रे :**

सभासदाने कर्ज मागणी ही संस्थेच्या छापील कर्ज मागणी अर्जात केली पाहिजे व त्या अर्जासोबत आवश्यक ते सर्व कागदपत्रे जोडले पाहिजेत. प्रत्येक कर्जासाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे अर्जासोबत जोडली पाहिजेत.

कोणत्या कारणासाठी कर्ज दिले जाणार नाही.

**अ) बिगर तारणी (जामीनकी) कर्ज :**

१) उत्पन्नाबाबत माहिती दर्शविणारी कागदपत्रे जोडली पाहिजेत.

२) नोकरदार असल्यास पगाराचा दाखला जोडला पाहिजे.

३) कर्जदार व जामीनदार यांच्या रेशन कार्ड अगर लाईट बिलाची झेरॉक्स

४) सदर कर्जाची जास्तीत जास्त मुदत ६० महिने राहील.

**२) तारणी कर्ज :**

**ब) नविन अथवा जुने वाहन तारण कर्ज :**

१) अर्जदाराची उत्पन्नासंबंधी कागदपत्रे आवश्यक आहेत.

२) अर्जदार याचा व्यवसाय असलेस हिशोब, ताळेबंद पत्रक व असेसमेंट ऑर्डर्स जोडणे आवश्यक आहे.

३) नवीन वाहन घ्यावयाचे असेल तर त्याचे कोटेशन जोडले पाहिजे व कोटेशनच्या २५% रक्कम आपल्या खात्यावर जमा केली पाहिजे. खरेदी रक्कम संबंधित डिलरकडे संस्था परस्पर पाठवेल.

४) वाहनाचे परमीट, आर. सी. बुक, टॅक्स बुक, विमा व आर.टी.ओ. वाहन ट्रान्स्फर करणे संबंधीची जरूर ती सर्व कागदपत्रे दिली पाहिजेत.

५) कर्ज घेतल्यानंतर ३० दिवसांचे आत वाहन प्रत्यक्ष संस्थेस दाखविणे व त्यावर संस्थेचे नाव घालणे आवश्यक आहे.

६) आर. सी. बुकावर व विमा पॉलीसीवर संस्थेचा बोजा नोंद करून आणण्याची जबाबदारी कर्जदार यांची राहील.

७) आवश्यकता वाटल्यास या कर्जासाठी स्थावर तारण घेतले जाईल.

८) जामीनदार व कर्जदार यांचे संस्था ओळखपत्र वीज, बिल रेशनकार्डाच्या झेरॉक्स जोडल्या पाहिजेत.

९) वाहनाची खरेदी पावती ही संस्था व कर्जदार यांच्या संयुक्त नावे असली पाहिजे.

१०) वाहनाच्या कर्जाची रक्कम पूर्ण फिटेपर्यंत कर्जदाराने विमा उतरविला पाहिजे. विमा कर्जदार व संस्थेच्या संयुक्त नावाने उतरणेचा आहे. मुदत संपणेपूर्वी विम्याचे नूतनीकरण कर्जदाराने केले पाहिजे. कर्जदाराने विम्याचे नूतनीकरण न केल्यास संस्था नूतनीकरण करून घेवून भरलेली विमा रक्कम कर्जदाराचे कर्ज खात्यात नावे टाकली जाईल व अशी रक्कम कर्ज समजून त्यावर व्याज आकारण्यात येईल. विम्याचे नूतनीकरण न केल्यामुळे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही. संस्थेने विम्याचे नूतनीकरण वेळेत केले नाही अशी सबब कर्जदारास करता येणार नाही.

११) जुने वाहन असल्यास तारण वाहन मालकी संबंधीची कागदपत्रे मान्यताप्राप्त मुल्यांकनकाराचा दाखला, इ. सर्व अनुषंगिक कागदपत्रे सादर करावी लागतील.

१२) सदर कर्ज मुदत जास्तीत जास्त ८४ महिने राहील.

**क) (१) व्यावसायिक कर्ज :**

१) अर्जदार नोकरदार असेल तर पगाराचा दाखला व हमी पत्र.

२) व्यवसाय असल्यास व्यवसायाची संपूर्ण माहिती व ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक, असेसमेंट ऑर्डर यांच्या प्रमाणित प्रती जोडल्या पाहिजेत.

Rukadi



३) कर्जास जी मिळकत तारण द्यावयाची आहे, त्या मिळकतीचे नवीन प्रॉपर्टी कार्ड, खरेदी पत्र/०७/१२ उतारा जोडले पाहिजे.

४) तारण प्रॉपर्टीचा मागिल १३ वर्षांचा सर्च रिपोर्ट दिला पाहिजे.

५) तारण देवू केलेली मिळकत तारण घेणेस निर्वेध व निष्कर्जी असल्याबाबतचा दाखला संस्थेच्या अधिकृत कायदे सल्लागाराकडून कर्जदाराने स्वखर्चाने घेवून सादर केला पाहिजे.

६) तारण मिळकतीचे मुल्यांकन संस्था नियुक्त व्हॅल्युएटर कडून करून घेतले पाहिजे.

७) तारण स्थावर मालमत्तेवर घेतलेल्या कर्जाचा बोजा कर्जदाराने नोंद (प्रॉपर्टी कार्डावर / सात बारावर) करून दिला पाहिजे.

८) स्थावर मिळकती संबंधीचे सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था आदींचे सर्व प्रकारचे कर कर्जदाराने अद्यावत भरले असले पाहिजेत.

९) मिळकतीतील हिस्सेदार यांना सहकर्जदार, मान्यतादार म्हणून समाविष्ट केले पाहिजे.

१०) सदर कर्जमुदत जास्तीत जास्त ८४ महिने राहील.

**ड) गृहबांधणी / फ्लॅट खरेदी कर्ज**

१) अपार्टमेंटचे मूळ मालक आणि बिल्डर्स, डेव्हलपर्स यांच्या समवेत झालेल्या ॲग्रिमेंटची प्रत कर्ज मागणी अर्जासोबत जोडली पाहिजे.

२) सेल ॲग्रिमेंट झाले असल्यास ते रजिस्टर असणे जरूरी आहे. त्याची प्रत अर्जासोबत जोडली पाहिजे.

३) अपार्टमेंट ॲक्ट खाली डिक्लरेशन घेतले पाहिजे.

४) प्रॉपर्टीचा सर्च रिपोर्ट देणे आवश्यक आहे.

५) फ्लॅट खरेदी झाला नसल्यास, संस्थेस तारण गहाणखत स्वत: मुळ जागा मालक, बिल्डर्स, डेव्हलपर्स व कर्जदार यांच्या संयुक्त सह्या निशी लिहून दिले पाहिजे.

६) गृहनिर्माण संस्थेचा सातबारा उतारा अगर प्रॉपर्टी कार्ड व मंजूर लेआऊट प्लॅनची अधिकृत प्रत.

७) या कर्जासाठी संस्थेच्या कायदा सल्लागाराचा अभिप्राय व अधिकृत मूल्यांकनकाराचा मूल्यांकन दाखला सादर केला पाहिजे. या संबंधीचा खर्च कर्जदाराने स्वत: करणेचा आहे.

८) मिळकतीचे सर्व कर व शुल्क अद्यावत भरले बाबतचे दाखले जोडले पाहिजेत.

९) तारण मिळकतीचा विमा कर्जदाराने स्वखर्चाने उतरला पाहिजे. विम्याची व विमा नूतनीकरणाची रक्कम संस्थेने भरल्यास ती कर्जदाराच्या कर्जखाती नावे टाकली जाईल व अशी रक्कम कर्ज समजून व्याज आकारणीस पात्र राहील.

१०) नवीन बांधकामाकरीता कर्ज रक्कम वेळोवेळी अदा करतेवेळी संस्थेच्या अधिकृत तज्ञाचा जरूर तो दाखला घेवून आणि योग्य तो दूरावा ठेवून रक्कम अदा केली जाईल.

११) संस्थेचे कर्जाच्या बोजाची नोंद सिटी सर्व्हे ऑफिस / गावकामगार तलाठी / गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत गृहनिर्माण संस्थेकडे करून दिली पाहिजे.

१२) सदर कर्जास आवश्यकतेनुसार १ वर्ष व मिळकतीचे पझेशन यामधील किमान कालावधी हा विश्रांती काळ म्हणून दिला जाईल. सदर विश्रांती काळात व्याज वसूल केले जाईल. मात्र सदर कर्जाची मुदत कोणत्याही परिस्थितीत विश्रांती काळ धरून १८० महिन्यांपेक्षा जास्त असणार नाही.

Rajarshi Shahu Arts & Comm. College, Rukadi



**इ) माल तारण मुदत कर्ज :**

१) अर्जदार याचा व्यवसाय उद्योगधंदा यातील गोदाम, कारखाना व दुकानातील कच्चा, प्रक्रियेतील व पक्का ल मुदत कर्जासाठी स्वीकारला जाईल.

२) संस्थेस मुदत कर्जासाठी तारण दिला जाणारा माल स्वतःच्या मालकीचा असल्याबाबत जरूर ती कागदपत्रे सादर केली पाहिजेत.

३) वरील खरेदी माल तारे गहाण कर्जाचे सर्व नियम या कर्जाला लागू राहतील.

४) भावातील चढ-उतारामुळे तारणी मालाची किंमत कमी झाल्यास कर्जदाराने दुरावा राखण्यासाठी योग्य तेवढी रक्कम भरली पाहिजे किंवा जादा माल तारण दिला पाहिजे.

५) तारणी माल ज्या ठिकाणी आहे ज्या ठिकाणी संस्थेच्या नावाचा बोर्ड सहज दिसेल असा कर्जदाराने लावणेचा आहे.

६) जास्तीत जास्त मुदत ३६ महिने राहील.

**ई) ठेव तारण कर्ज :**

१) संस्थेतील स्वतःच्या अगर इतर ठेवीदारांच्या ठेव, तारण म्हणून स्वीकारल्या जातील.

२) अज्ञान व्यक्तिच्या नावाची ठेव असलेस त्यावरील कर्जाचा विनियोग अज्ञानाच्या भल्यासाठी करणार असलेबाबत पालनकर्त्यांनी डिक्लेरेशन दिले पाहिजे.

३) कर्ज रकमेस जरूर तो दुरावा ठेवला जाईल.

४) मुदतीत कर्ज फेड झाली नाही तर ठेव रकमेतून कर्जाची भरपाई करून घेतली जाईल.

५) ठेवीची मुदत संपेपर्यंत कर्जाची मुदत राहील तसेच एकापेक्षा अधिक तारण असल्यास सर्वांत अगोदर मुदत संपणाऱ्या ठेवीच्या मुदतीएवढीच कर्जाची मुदत राहील.

**फ) सोने /चांदीचे दागिने तारण कर्ज :**

१) सभासदांच्या स्वतःच्या मालकीचे सोने-चांदीचे दागिने या कर्जासाठी तारण म्हणून स्वीकारले जातील.

२) आधारभूत ठरलेल्या किंमतीच्या मुल्यांकनाच्या आधारावर कर्ज दिले जाईल.

३) तारण दागिने व वस्तू यांचे मुल्यांकन संस्थेने अधिकृत केलेल्या सराफाकडून केले जाईल व त्यासाठी कर्जमागणीदाराने जरूर ते शुल्क देणेचे आहे.

४) तारण दिलेले दागिने व वस्तू कर्जदाराचे निर्वेध मालकीचे असले पाहिजेत व त्या बद्दल कर्जदाराने करारपत्र दिले पाहिजे.

५) तारण दिलेले हे स्त्रीधन असलेस त्याबाबत संमतीपत्र दिले पाहिजे.

६) सोने-चांदीचे दरात उतार झालेस दुराव्याची रक्कम कर्जदाराने तातडतोब संस्थेत भरणेची आहे.

७) वस्तु ताब्यात घेतल्यानंतर संस्था त्याची पोहोच पावती देईल, कर्ज खाते बंद करताना पोहोच पावती परत केली पाहिजे. पोहोच पावती दिल्यानंतरच तारण दागिने - वस्तू मिळाल्याबद्दल पोहोच घेवून दिल्या जातील.

८) कर्ज थकित झालेस, तारण गहाण सोन-चांदी दागिने व वस्तू परस्पर विक्री करून कर्ज भरून घेणेचा अधिकार संस्थेस राहील.

९) सदर कर्जाची मुदत जास्तीत जास्त १ वर्ष राहील.

**ग) कॅश क्रेडीट कर्ज :**

संस्था कॅश क्रेडीट कर्जे ही केवळ व्यावसायिक गरजेपोटी देईल. तसेच कॅश क्रेडीट कर्जासाठी सहकार खात्याने

अनुत्पादक कर्ज वर्गवारीचे जाहीर केलेले निकष लागू राहतील. कॅश क्रेडीट कर्जास जास्तीत जास्त मुदत एक वर्ष राहील व प्रतिवर्षी त्यांचे नुतनीकरण केले जाईल.

**टीप– वरील कर्ज नियमावली ही केवळ मार्गदर्शक तत्वे स्वरूपात असून कर्ज सुरक्षितेसाठी संस्था कर्जाच्या उपरोक्त नमुद मुदती व्यतिरिक्त स्वत:चे कर्ज धोरणात / कर्ज नियमात अधिक निकष ठरवू शकेल.**

**नियम क्र. १२ कर्ज मंजुरीबाबत चौकशी**

अ) कर्ज मागणी अर्जावर संस्थेने घेतलेल्या निर्णयाची चौकशी संबंधित कर्ज मागणीदाराने करणेची आहे. कर्ज मंजूर झाल्यापासून तीन महिन्याचे आत त्याची उचल कर्ज मागणीदाराकडून न झाल्यास कर्ज मंजूरी रद्द समजणेत येईल.

ब) मंजूर झालेले कर्ज दिलेच पाहिजे असे बंधन संस्थेवर राहणार नाही.

**नियम क्र. १३ दस्तऐवजांची पुर्तता :**

विविध प्रकारच्या कर्जासाठी संस्थेने अंमलात आणलेली कागदपत्रे कर्जदार व जामीनदार यांनी संस्थेच्या अधिकाऱ्यासमक्ष पूर्ण करून व सह्या करून दिले पाहिजेत. त्या शिवाय कर्ज अदा केले जाणार नाही. दस्ताऐवज पूर्तता व सांभाळणेची जबाबदारी ही शाखा व्यवस्थापक व संबंधीत अधिकाऱ्यांची असेल

**नियम क्र. १४ अनुषंगिक खर्च :**

कर्ज देते वेळी अगर दिल्यानंतर कर्ज प्रकरणा संबंधित निर्माण झालेले अगर होणारे संशोधन व तपासणी खर्च, कायदा सल्ला शुल्क, मुद्रांक वसुली संबंधी झालेला खर्च इत्यादी खर्चाची जबाबदारी कर्जदाराची राहील व असा खर्च संस्थेस करावा लागलेस तो कर्जदाराच्या खात्यावर नावे टाकून त्यावर व्याज आकारणी केली जाईल.

**नियम क्र. १५ कर्ज देण्याची पद्धती :**

अ) कर्जाची रकम रोखीने दिली जाणार नाही. ती कर्जदाराला चेकने अथवा त्याचे सेव्हिंग खातेवर वर्ग केली जाईल.

ब) कर्जदारास कर्जाचे पासबुक दिले जाईल, ते पासबुक वेळोवेळी संस्थेकडून भरून घेणेची जबाबदारी कर्जदाराची राहील.

**नियम क्र. १६ कर्जाचा विनियोग :**

ज्या कारणासाठी कर्ज मंजूर झाले असेल असेल त्याच कारणासाठी कर्जदाराने त्याचा विनियोग केला पाहिजे. कर्जाचा विनियोग अन्य कारणासाठी केल्याचे आढळून आल्यास कर्ज परतफेडीचे मुदत संपण्यापूर्वीसुद्धा ताबडतोब परत करावे अशी मागणी करणेचा संस्थेस हक्क राहील आणि संस्था संबंधित कर्ज वसुलीसाठी आवश्यक ती पुढील कारवाई करू शकेल.

**नियम क्र. १७ जनरल लिन :**

कर्जदार व जामीदार यांची संस्थेकडे असलेली ठेव, इतर जमा रकमा अगर दुसरी कोणतीही मालमत्ता तारण समजून येणे असलेल्या थकबाकी पोटी वसूल करणेत येईल.

**कोणत्याही कर्जास मुदत वाढ दिली जाणार नाही.**

**नियम क्र. १८**

वरील कर्ज देताना आवश्यक असेल तेथे अधिकृत मुल्यांकन करणाऱ्या इसमातर्फे संपत्तीचे मुल्यांकन करून घेतले जाईल. याचा खर्च अर्जदारास करावा लागेल. मुल्यांकनकाराकडून संस्थेने आवश्यकत रकमेचा जामीन बॉंड करून घ्यावा.

**नियम क्र. १९**

जामीनदाराची आर्थिक पत विचारात घेवून संचालक मंडळ एक जामीनदार किती कर्जदारास जामीन राहू शकेल याबाबत निर्णय घेईल. मात्र एका वेळेस दोन पेक्षा जास्त कर्जदारांना जामीन राहू शकणार नाही.

Rajarshi Shahu Arts & Comm. College, Rukadi

नियम क्र. ५४

वरील नियमात वेळोवेळी निबंधकाची पूर्वपरवानगी घेवून बदल करता येतील.

५४. **वैधानिक लेखापरिक्षण –**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ नुसार निबंधकांनी अधिकृत केलेल्या पॅनल मधील लेखा परिक्षकांकडून संस्थेचे हिशोब तपासले जाणे ही संचालक मंडळाची जबाबदारी राहील. वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक आणि लेखा परिक्षण शुल्काची आकारणी याविषयी संस्थेने तिच्या वार्षिक साधारण सभेमध्ये निर्णय घेणे आवश्यक आहे. तथापि ३० सप्टेंबर अखेर लेखा परिक्षण पूर्ण न झाल्यास झाल्यास सहकार खात्याकडून संस्थेचे लेखापरिक्षण करून घेण्यात येईल.

५५. **संस्थेची मोहोर (सिल) –**

संस्थेची एक मोहोर (सिल) तयार करण्यात येईल व ती मुख्य कार्यकारी अधिकारी/अध्यक्ष / सचिव यांचे ताब्यात राहील. सदरहू मोहोर (सिल) संचालक व मुख्यकार्यकारी अधिकारी/अध्यक्ष यांचे समक्ष संचालक मंडळाचे ठरावाप्रमाणे वापरली जाईल.

५६. **उपविधी दुरूस्ती –**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १३ व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चा नियम १२ मध्ये दाखविलेल्या कार्यपद्धतीनुसार उपविधीत कोणताही बदल करता येईल. रद्द करता येईल किंवा त्याऐवजी नवीन उपविधी स्वीकारता येईल.

२. वरील (१) प्रमाणे मंजूर झालेल्या उपविधीची अंमलबजावणी नोंदणी अधिकाऱ्यांची लेखी मंजुरी मिळाल्याच्या तारखेपासून होईल.

५७. **दैनंदिन व्यवसायाव्यतिरिक्त होणाऱ्या जास्तीत जास्त खर्चाची मर्यादा :**

अ) अन्य सहकारी संस्थांना प्रायोजक म्हणून देणगी देवू शकणार नाही.

ब) कोणत्याही सामाजिक कार्यासाठी खर्च करत असताना संस्था सामाजिक बांधिलकीचा निधी उभारून त्याबाबतचे स्वतंत्र नियम तयार करून खर्च करू शकेल

क) मागील वर्षाच्या जाहीर निव्वळ नफ्याच्या १% पर्यंतचाच खर्च हा एकूण देणग्या किंवा सामाजिक कार्यासाठी करता येतील. तसेच एका देणगीसाठी ही जास्तीत जास्त मर्यादा रु. २५०००/– इतकी असेल.

ड) ज्या संस्थेला तोटा झाला असेल अशी संस्था देणगी देवू शकणार नाही.

५८. नफ्याची वाटणी

१) सहकारी संस्था कायदा व नियम यास अनुसरून संस्थेचा निव्वळ नफा काढला जाईल व त्याची वाटणी संचालक मंडळाचे शिफारशींनुसार साधारण सभेत खालीलप्रमाणे करण्यात येईल.

सहकारी संस्था कायद्याचे तरतूदीनुसार २५% पेक्षा कमी नाही इतका नफा वैधानिक राखीव निधीत जमा केला जाईल.

श्री शेती सह. पत संस्था

२) उपरोक्त नियमाव्यतिरिक्त उर्वरित निव्वळ नफ्याची विभागणी खालीलपैकी एका कारणासाठी किंवा सर्व कारणासाठी करता येईल.

अ) वार्षिक साधारण सभेने ठरविल्यानुसार व कायदा व नियमानुसार सभासदांना लाभांश देणेसाठी सदर नफ्याची विभागणी करता येईल.

ब) मागील निवडणूकीच्या खर्चाच्या १/५ रक्कम निवडणूक निधी म्हणून खर्च करता येईल.

क) संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार गुंतवणूक चढ-उतार निधी करीता आवश्यक ती तरतूद करावी.

ड) संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार तंत्रज्ञ विकास निधी म्हणून वर्ग करता येईल.

इ) उर्वरित निव्वळ नफा (शिल्लख राहिल्यास) इमारत निधीस वर्ग करता येईल.

५९. **भाग भांडवलाची कर्जाशी प्रमाण :**

कर्जदार सभासदासाठी भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण पुढीलप्रमाणात राहील

१) विनातारणी कर्जासाठी कर्ज रकमेच्या ५% पर्यंत.

२) तारणी कर्जासाठी कर्जरकमेच्या २.५% पर्यंत

तथापि कोणत्याही सभासदाला संस्थेच्या भाग भांडवलाच्या १/५ किंवा जास्तीत जास्त रु. २ लाख यापैकी जी कमी असेल ती रक्कम भाग भांडवल म्हणून घेता येईल.

तथापि सहकार खात्याने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास ते कर्जदारावर बंधनकारक राहील.

६०. **राखीव निधी :**

१) सहकारी कायदा नियम व उपविधी यात नमूद केलेल्या रकमेशिवाय राखीव निधीत प्रवेश फी, नाममात्र सभासद फी, भाग वर्ग करण्याची फी जप्त केलेल्या भागांची रक्कम, जप्त केलेल्या लाभांशाची रक्कम व देणग्या या रकमा जमा करता येतील.

२) राखीव निधीची गुंतवणूक कायदा व नियमानुसार करता येईल.

३) राखीव निधीची रक्कम निबंधकाच्या पूर्व परवानगीने व महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा व त्याच नियम यानुसार कोणत्याही मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरू शकेल.

६१. **लाभांश :**

१) लाभांशाची रक्कम ती ज्या सहकारी वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी सदरहू भाग ज्याचे नावाने संस्थेचे पुस्तकात असेल त्यास प्रोरेटा पद्धतीने देण्यात येईल.

२) ज्याचे नाव संस्थेच्या पुस्तकात त्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी असेल अशा भागधारकांची रक्कम जितके महिने असेल त्या प्रमाणात तसेच भागाचे प्रमाणात लाभांश दिला जाईल. तसेच लाभांश जाहीर झाल्यानंतर दोन महिन्याचे आत अशी रक्कम देणेत यावी.

३) लाभांशाची रक्कम संस्थेच्या मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये मिळू शकेल.

४) लाभांश जाहीर केल्यानंतर तीन वर्ष न घेतलेल्यास ती रक्कम जप्त करून राखीव निधीत जमा केली जाईल.

५) कोणत्याही संस्थेस जास्तीत जास्त १५% पर्यंत लाभांश देता येईल.

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

६२. **हिशेब, नोंदी व लेखापरिक्षण**

१) संस्थेतील व्यवहाराबद्दलचे दप्तर व हिशेब मे. निबंधक, सहकारी संस्था यांनी ठरवून दिलेया व मान्य केलेल्या नमुन्यात ठेवले जातील. संस्थेचा कोणताही सभासद त्याचे संबंधित व्यवहाराविषयी हिशेब व रजिस्टर्स संस्थेच्या कामकाजाचे वेळात पूर्वसुचनेनुसार वेळ ठरवून पाहू शकेल.

२) संस्थेच्या हिशेबांचे वैधानिक लेखा परिक्षण मा. निबंधक यांनी मान्यता दिलेल्या लेखापरिक्षकांच्या यादीतील लेखापरीक्षकाकडून प्रत्येक आर्थिक वर्षात एका वेली करण्यात येईल.

३) सदरचे लेखापरीक्षकांची नेमणूक व त्याकरीताचे मानधन यास वार्षिक साधारण सभेत मान्यता घ्यावी लागेल. तसेच त्यांची पात्रता, अपात्रता, अधिकार, कर्तव्ये व जबाबदाऱ्या ह्या सहकार खात्याने मार्गदर्शक तत्वानुसार किंवा संबंधित कायद्यानुसार असतील.

६३. **सहकार शिक्षण प्रशिक्षण निधी :**

सभासद/ संचालक व कर्मचारी ह्यांचे शिक्षण / प्रशिक्षणासाठी संस्था स्वतंत्र निधीची उभारणी करेल. तसेच सदर निधी विनियोगासंबंधी संचालक मंडळ सर्व साधारण सभेच्या मान्यतेने आवश्यक ती सर्व कार्यवाही करेल.

सभासद, संचालक, कर्मचारी यांना शासनमान्य प्रशिक्षण संस्था तसेच राज्य / विभागीय / जिल्हा स्तरावरील पतसंस्थांच्या नोंदणीकृत फेडरेशनमार्फत दिलेले प्रशिक्षण हे ग्राह्य धरले जाईल. तसेच लेखापरिक्षण गुणवारी निकषामध्ये ते विचारात घेतले जाईल.

म. स. सं.अधिनियम १९६० कलम २४ क नुसार विहित केलेल्या दराने अथवा असा दर विहित नसल्यास संस्थेने स्वतःचे व्यवसाय व्याप्तीनुसार वार्षिक सभेचे मान्यतेने प्रतिवर्षी सहकार शिक्षण प्रशिक्षण निधीमध्ये अंशदान करणे बंधनकारक राहील. तसेच सदर अंशदान रकमेची तरतूद प्रतिवर्षाचे अंदाजपत्रकात असणे आवश्यक राहील.

६४. **भविष्य निर्वाह निधी :**

कायदा १९५२ नुसार संस्था भविष्य निर्वाह निधीसाठी कर्मचाऱ्यांच्या पगारातून जाणाऱ्या भविष्य निर्वाह निधी इतकीच रक्कम संस्थेचा हिस्सा म्हणून कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी जमा करावी.

६५. **सेवानियम / कर्मचारी उत्तरदायीत्व धोरण :**

संचालक मंडळ वेळोवेळी सेवकांसाठीच्या सेवानियमांमध्ये बदल करू शकते. मात्र अंतिम मंजुरीचे अधिकार वार्षिक साधारण सभेला राहतील. तसेच कर्मचाऱ्यांसाठी उत्तरदायीत्व धोरण ठरवण्याचे अधिकार संचालक मंडळास राहतील.

६६. **व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रीयेमधील कर्मचारी असोसिएशनचा सहभाग:**

प्रशासकीय सुचनेद्वारे कर्मचारी असोसिएशनचा व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रीयेमध्ये सहभाग असण्याच्या दृष्टीने योग्य ते नियम संस्था करू शकते.

६७. **कार्यक्षेत्र व शाखा विस्तार**

नागरी सहकारी पतसंस्थांना स्वायतत्ता देणे व कार्यक्षेत्र / शाखा विस्तारासाठी नियोजन करता येणेसाठी खालील निकष ठरविणेत येत आहे.

१) कार्यक्षेत्रामध्ये वाढ देताना खालीलप्रमाणे टप्याटप्याने वाढ दिली जाईल.

अ) वॉर्ड / गावस्तरावरून तालुका स्तरावर

क) जिल्हा स्तरावरून सहकार विभागाच्या रचनेतील विभाग स्तरावर.

ड) विभागस्तरावरून राज्यस्तरांपर्यत.

२) कार्यक्षेत्र वाढ व शाखा विस्तारासाठी प्रत्येक संस्थेने प्रतिवर्षी डिसेंबर पूर्वी कृती आराखडा सहकार खात्याकडे सादर करणे आवश्यक राहील. सदर कृती आराखड्याला संस्थेचे वार्षिक / विशेष साधारण सभेने मान्यता देणे बंधनकारक राहील.

३) सदर कृती आराखड्यास सहकार खात्याकडून ३१ मार्च पूर्वी संस्थेस निर्णय कळविला जाईल.

R. No. KPR/BLR/RSR/(C)/1967/2000 Dt.1-8 2000
Rukadi

४) कार्यक्षेत्र व शाखा विस्तार मंजुरीनंतर त्याची वैधता एक वर्षापर्यंतच राहील. तसेच एकदा मंजुरी घेऊन शाखा विस्तार / कार्यक्षेत्र विस्तार संस्थेने न केल्यास पुढील तीन वर्षांपर्यंत त्यांना पूर्वीची मंजुरी दिलेल्या शाखा / कार्यक्षेत्र विस्तारास मान्यता मिळणार नाही.

५) ज्या संस्थेच्या दहापेक्षा कमी शाखा आहेत. त्यांना प्रतिवर्षी जास्तीत जास्त एकाच शाखेसाठी मान्यता मिळेल व ज्या संस्थेच्या दहा किंवा त्यापेक्षा अधिक शाखा असतील तर त्यावेळी प्रस्ताव सादर केला जाईल. त्यावेळचे लगतचे ३१ मार्च रोजी संस्थेच्या कार्यरत असणाऱ्या शाखांचे संख्येच्या १०% किंवा जास्तीत जास्त पाच यापैकी किमान संख्येएवढ्या शाखा विस्तार करता येईल.

६) संस्थेने कार्यक्षेत्र विस्ताराचे मंजुरीनंतर पुढील एक वर्षात तेथे शाखा न उघडल्यास सदरचे कार्यक्षेत्र मंजुरी रद्द करणेचा अधिकार सहकार खात्यास राहील. मात्र अशी मंजुरी रद्द करताना संस्थेला त्याची बाजू मांडण्याची योग्य संधी दिली जाईल.

७) कार्यक्षेत्र / शाखा विस्तारासाठी संस्थेने खालील निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

अ) ज्या वर्षी प्रस्ताव सादर केला जाईल त्याचे लगतचे सलग तीन वर्षातीन वर्षासाठी संस्थेस 'अ' वर्ग असणे आवश्यक तसेच निव्वळ नफा असला पाहिजे.

ब) संस्थेने वैधानिक तरलता / रोख तरलता / अनुत्पादक जिंदगी / स्वनिधी / महत्तम कर्ज मर्यादा/ या सर्वच निकषांची पूर्तता करणे आवश्यक राहील. तसेच वरील सर्व निकष पूर्ततेबाबत वैधानिक लेखापरिक्षकांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

८) विलिनिकरण / शाखा स्थलांतर यासाठी वरील निकषांबाबत सवलत देण्याचा अधिकार सहकार खात्याकडे राहील.

**६८ अ. माहिती विवरण पत्रके :**

सहकार खात्याने वेळोवेळी निर्धारीत केलेली माहिती विहित नमुन्यात व मुदतीत संस्थेने संबंधीत निबंधाकडे सादर करणे बंधनकारक राहील. तसेच यामध्ये कोणताही दोष, त्रुटी किंवा निष्काळजीपणा निर्देशनास आल्यास प्रचलित कायदा / नियम यातील तरतूदी नुसार कारवाई केली जाईल.

**६८ ब. : अधिशेष मत्तेचा विनियोग**

समापन झालेल्या संस्थेच्या अधिशेष मत्तेचा विनियोग राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीस अधिन राहून करण्यात येईल.

**६९. इतर :**

१) संस्थेस महाराष्ट्र राज्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे बँकेस सभासद होता येईल. याशिवाय खालील संस्थांची वर्गणीदार सभासद होवू शकेल.

अ) नागरी सहकार पतसंस्थांचे स्तरावरील राष्ट्रीय फेडरेशन.

ब) नागरी सहकारी पतसंस्थाचे राज्य स्तरावरील फेडरेशन.

क) पतसंस्थांचे विभागीय / प्रादेशिक / जिल्हा किंवा तालुका फेडरेशन

ड) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ / जिल्हा सहकारी बोर्ड

इ) भारतीय सहकारी असोसिएशन

फ) पतसंस्था संबंधित असणारे इतर कोणतेही फेडरेशन / असोसिएशन /संघ/ बोर्ड सल्ला घेण्यात यावा व त्यांनी याबाबत दिलेला निर्णय हा अंतिम राहील.

ब) डिक्री, ऑर्डर्स, निर्णय याबाबत कार्यवाही करताना कायद्यातील सर्व तरतूदींचे पालन करावे.

क) वरिष्ठ पातळीवरील अपिल व संबंधित केसची पुनर्वलोकन याचिका या कायदेशीर तरतूदींनुसार असाव्यात.

ड) गुन्हा व दंड याबाबतची कार्यवाही कायद्यातील तरतूदींनुसार करावी.

इ) मा. निबंधकांकडे रिटर्न फाईल करताना कायद्यातील तरतूदींचे पालन करावे.

फ) वरीलबाबत उपविधींमध्ये एखादी तरतूद नसल्यास अशावेळी कायदा व नियमातील तरतूदींनुसार निर्णय प्रक्रिया पार पाडावी.

## नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे 'आदर्श उपविधी' (२०१३)

### प्रवर्तकांची / संचालकांची नांवे

| अ.क्र. | नांवे | सही |
|---|---|---|
| १ | श्रीमती निवेदिता संभाजीराव माने | [signature] |
| २ | श्री. हर्षशील संभाजीराव माने | [signature] |
| ३ | श्री. अर्जुन बाबूराव राजगे | [signature] |
| ४ | श्री. सदाशिव हरीबा भोसले | [signature] |
| ५ | श्री. सुनाक्षिणी रामचंद्र देसाई | [signature] |
| ६ | श्री. अरविंद दत्तात्रय कुंभार | [signature] |
| ७ | श्री. शिवाजी रामचंद्र शिंदे | [signature] |
| ८ | श्री. शंकर रानबा दळवी | [signature] |
| ९ | श्री काशिनाथ महादेव भोसले | [signature] |
| १० | श्री. डोंगू बाबूराव खोत | [signature] |
| ११ | श्री. रामराव बापू कुंभार. | [signature] |
| १२ | | |
| १३ | | |
| १४ | | |
| १५ | | |
| १६ | | |
| १७ | | |

Rajarshi Shahu Arts & Comm. College Rukadi

# उपविधी क्र. ड : ९ नुसार सभासद होण्याकरिता अर्जाचा नमुना

मा. अध्यक्ष/सचिव

____________ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

____________

____________

महोदय,

मी श्री./श्रीमती ____________ वय ______ राहणार ____________ आपल्या संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणार असून आपल्या संस्थेचा सभासद होण्याकरीता अर्ज सादर करीत आहे. माझी माहिती खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

१. १) संपूर्ण नांव

२) व्यवसाय

३) मासिक उत्पन्न रु.

४) सेवेमध्ये असल्यास कार्यालयाचा/व्यवसायाचा पत्ता

पद

५) कायम निवासी पत्ता

६) मूळ गावचा पत्ता

७) शिधावाटप पत्रिका क्र. (प्रत जोडावी)

८) नागरी सहकारी पतसंस्था/नागरी सहकारी बँक/कर्मचारी पतसंस्था यामध्ये यापूर्वी सभासद असल्यास संस्थेची नावे व पत्ता आणि धारण केलेल्या भागांची रक्कम

९) वरील क्र. ८ मध्ये नमूद केलेल्या संस्थाकडून कर्जे, ठेवी व्यवहार केला असल्यास त्याचा संपूर्ण तपशील

२. संस्थेच्या उपविधीमध्ये विहित केल्याप्रमाणे भागाची रक्कम रु.
आणि प्रवेश फी रुपये ________ एकूण रुपये ________ रोख/धनादेश क्र. ________
दिनांक ________________ या सोबत भरणा केली आहे.

३. मी घोषित करतो की, ड ११.१ मध्ये नमूद केलेल्या सभासदत्वासाठी अटींची पूर्तता केली आहे.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम आणि आपल्या संस्थेचे मंजूर आदर्श उपविधी २०१३ मला बंधनकारक राहतील.

तरी आपल्या संस्थेच्या उपविधीमधील तरतुदीनुसार संस्थेचे सभासदत्व द्यावे

आपला विश्वासू,

स्थळ : साक्षांकित ( ____________ )

दिनांक :



I/C Principal
RAJARSHRI SHAHU ARTS AND COMMERCE COLLEGE, RUKADI